म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १८५८
सन १९२३

शांतिनिकेतमाळा
(रवींद्र. टागोर)

प्र० ना० व० चव्हाण
सन - १९२३
सारस्वतिनंदन (अनुवादक)

REFBK-0002367
REFBK-0002367

# शान्तिनिकेतन माला



ग्रंथालय ठाणे
23560
REFBK-0002367
REFBK-0002367

ता. क.
मालेचा पहिला भाग पाठवून तीन महिने
झाले अभिप्राय व [illegible] भेट अद्याप आलेली
नाहीं असें कां ? महाराष्ट्रांतील सर्व वृत्त-
पत्रें प्रेमानें भेट देत आहेत मग आपणा-
[illegible] कां असा ?

ग्रं. क्र. 23690

# ज्ञानवृद्धांचा आशिर्वाद !

वि. वि. आपण ही परमार्थज्ञान परिमळयुक्त पुष्पमाला गुंफण्याचें महत्कार्य अंगिकारलें तें अत्यंत पुण्यकारक असून भूषणास्पद आहे, यांत तर शंकाच नाहीं. आजपर्यंत आपण 'शनैःपंथाशनैः कंथा शनैःपर्वत दुर्गमे' या न्यायानें आपल्या सामर्थ्यानुरूप महाराष्ट्र वाङ्मयांत जी भर घालीत आहां तींत या मालेनें पुष्कळच भर पडली. वाङ्मयाची निवड करणें व विशेष भार न पडूं देतां जिज्ञासूस त्याचा लाभ करून देणें ही आपली हातोटी इतर बुकसेलरांनींही कित्ता घेण्यासारखी आहे. देवालयास जसा कळस बसवावा त्याप्रमाणें आजपर्यंतच्या आपल्या सर्व वाङ्मय मंदिराचा 'शान्ति निकेतन' हा एक कळसच झळकून राहिला आहे. वंग कविरत्न डॉ. रवींद्रनाथ टागोर ह्यांची कीर्ति साऱ्या हिंदुस्थानांतच नव्हे, तर सातासमुद्रापलीकडेही दुमदुमत राहिली आहे. एतद्देशीय कवींमध्यें तर त्यांनीं ८००० पौंडाचें बक्षीस मिळवून 'पोएट लारिएट' हें नांव संपादन केलें; म्हणजे अर्वाचीन कविवृंदांत हे एक 'कविकुलगुरुच' झाले आहेत. काव्य कर्तृत्व हें तर असोच; पण त्याशिवाय ते खरेखरे तत्त्वज्ञानी आहेत; खरेखरे भगवद्भक्त आहेत; खरेखरे मर्मज्ञ आहेत व खरेखरे विचारशील आहेत. म्हणजे आजमितीला हे एक सत्पुरुष ईश्वरी अंश, साधु आहेत. त्यांच्या मुखांतून निघणारा प्रत्येक शब्द अमृतमय आहे. त्याचा लाभ प्रत्येक मनुष्यास घडणें, त्यांच्या अधिकारयुक्त वाणीचे शब्द प्रत्येक मनुष्याच्या कानांत घुमत राहणें हें मोठें भाग्यानें लक्षण होय. त्यांची भाषा भिन्न असल्यामुळें महाराष्ट्रीयांस ह्या गोष्टी मोठ्या दुर्घट होत्या. त्या आपण आपल्या 'शान्ति निकेतन' मालेनें

अगदीं सुलभ व सुखसाध्य केल्या आहेत. ह्याबद्दल महाराष्ट्रदेशानें आपले खरोखरच ऋणी असले पाहिजे.

भगवान् रामकृष्ण परमहंस; स्वामी विवेकानंद; स्वामी रामतीर्थ; अशा परमेश्वर विभूतींच्या वाणीनें ज्याप्रमाणें महाराष्ट्रदेशही पुनीत केला, त्याप्रमाणेंच महर्षि रवींद्रनाथ टागोर यांच्या वाणीनें महाराष्ट्रास पुनीत करण्याचें महत्कार्य आपण हातीं धरलें याबद्दल कोणीही झाले तरी आपलें अभिनंदनच करणार. असें असतांही कित्येक वर्तमानपत्रकारांहीं व मासिककारांनीं त्यांतील कांहीं हस्तदोष पाहून त्यावर बरीच टीका केली आहे; पण गंगोदक सुवर्ण कलशांत असलें काय आणि एखाद्या मृत्तिका घटांत असेल काय त्याची गोडी व पवित्रता सारखीच. जो खरा तृषार्त आहे तो आधीं तें पवित्रोदक प्राशन करून तृप्तच होणार त्याचें त्याच्या पात्राकडे आधीं लक्षच जावयाचें नाहीं आणि जो पात्राकडेच पहात राहील तो तृषार्तच नव्हे म्हणून समजावें आणि तृषाच ज्याला नाहीं त्याला पात्र सुवर्णाचें असलें म्हणून काय आणि उदक गंगेचें असलें म्हणून तरी काय, तो त्या दोहोंचाही भोक्ता नव्हे. तथापि कोणत्याही पवित्रोदकाला पात्र हें घासलेलें पुसलें, स्वच्छ असावें हेंच उक्त. मग तें गंगोदकासारख्या पवित्र जीवनाला तें तसें असणें व ठेवणें हेंच उक्त आहे. ह्याकरितां आपणांस माझी प्रेमभावाची सूचना आहे कीं, पुढील भागापासून शुद्धाशुद्धाकडे व भाषेच्या दुर्बोधतेकडेही लक्ष पुरविणें; म्हणजे हीच आपली कृति याहूनही लोकादरास पात्र होईल. लो. हो. वि.

औंध.
ता. २३-६-२३.

कृ. ना. आठल्ये,
एडिटर, केरळकोकिळ.

# विषयानुक्रमणिका.


| विषय. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ स्वराज्य आणि रवीन्द्रनाथ. | ... | ३ ते २५ |
| २ आमची विश्वभारती संस्था. | ... | २७ ,, ४४ |


## शान्तिनिकेतन भाग दुसरा.


| | | | |
|---|---|---|---|
| ३८ समग्र. | ... | ... | ४७ |
| ३९ कर्म. | ... | ... | ५१ |
| ४० शक्ति. | ... | ... | ५५ |
| ४१ प्राण. | ... | ... | ५८ |
| ४२ जगांत मुक्ति. | .... | ... | ६० |
| ४३ समाजांत मुक्ति. | ... | ... | ६२ |
| ४४ मत. | .... | .... | ६४ |
| ४२ निर्विशेष. | ... | ... | ६७ |
| ४६ द्वैत. | .... | .... | ६९ |
| ४७ विश्वव्यापि. | ... | ... | ७१ |
| ४८ मृत्युचा प्रकाश. | ... | ... | ७३ |
| ४९ नूतन वर्षारंभाचा उत्सव | ... | ... | ७५ |
| ५० भाव आणि पवित्रपणा | ... | ... | ८९ |
| ५१ अंतर बाहेर. | ... | ... | ९३ |

| | | |
|---|---|---|
| ५२ तीर्थ. | ... ... | शाने |
| ५३ विभाग. | ... ... | |
| ५४ द्रष्टा. | ... ... | १०३ |
| ५५ नित्याधाम. | ... ... | १०५ |
| ५६ परिणय. | ... ... | १०७ |
| ५७ अवस्थात्रय | ... ... | १११ |
| ५८ वासना, इच्छा आणि मंगल. | ... | ११३ |
| ५९ स्वाभाविक क्रिया. | ... ... | ११७ |
| ६० उपासना. | ... ... | ११९ |
| ६१ अभ्यास. | ... ... | १२१ |
| ६२ प्रार्थना. | ... ... | १२३ |
| ६३ वैराग्य. | ... ... | १२६ |
| ६४ विश्वास. | ... ... | १३० |
| ६५ सिद्धी. | ... ... | १३३ |
| ६६ निष्टा. | ... .... | १३५ |
| भक्तवाणी. १ ते १५ | ... ... | १३७ ते १६० |



# कनौजी अत्तरें ! अत्तरें ! !

दर तोळा रु. १ ते १५, सुगंधी तेलें दर शेरीं रु. ३ ते १०, मुश्की तंबाखु दर शेरीं रु. २, ४, ८, १२, १६, शिवाय गुलाबजल, गुलकंद, मोरावळा, चंदनीतेल, अत्तरदानें, वगैरे मिळेल.

एम्. जी. फाटक एन्ड को, परफ्यूमर्स. पो. कनौज. (यू. पी.)

ॐ

# रवीन्द्राची आमृत वाणी.

पाहोनी रविचा प्रकाश पडला,
प्राची दिशेच्या वरी ।
काया सोडुनी जीव मोहवश हा,
धावे पतंगापरी ॥
आहे पैलतिरीं ' ज ल स्थ ल ' अशी,
तो आयके वैखरी ।
कीं त्या ' शा न्ति नि के त नी '
त्रिभुवन प्रज्ञा सुखें आदरी ॥ १ ॥



शान्तिनिकेतनांतील विद्यार्थी.

## शान्तिनिकेतन मालेच्या पहिल्या भागाविषयीं

# विद्वान पत्रकर्त्यांचे प्रशंसोद्गार.

१ स्वराज्यः—( १९–४–२३ ) "... डॉ. रवींद्रनाथ टागोर यांचे सविस्तर चरित्र पहिल्यानें देण्यांत आलें आहे व त्यानंतर एकंदर ३७ विषयांवर तत्वज्ञानात्मक आणि वाङ्मयात्मक असे विचार प्रकट करण्यांत आले आहेत. डॉ. रवीन्द्रनाथ टागोर यांचें चरित्र मराठी वाचकांना विदित होण्याला हे पुस्तक चांगलें साधनीभूत होईल. त्याचप्रमाणें यांतील विविध विषयांवरील विचार मनावर फारच चांगले संस्कार उत्पन्न करण्यासारखे आहेत. बंगाली भाषेतील अशा प्रकारच्या उच्च दर्जाचें वाङ्मय मराठीमध्यें अवतीर्ण करण्याच्या कामीं रा. ना. व. चव्हाण यांनीं हा जो स्तुत्य उद्योग आरंभिला आहे, त्यांत त्यांना मराठी वाचकवर्ग पूर्ण उत्तेजन देईल, तर त्यांना आपल्या भाषेची अशीच सेवा करण्याला जास्त उत्साह येईल... "

२ महाराष्ट्रः—( २५–४–२३ ) "... कविसम्राट डॉ. रवींद्रनाथ टागोर यांचें चरित्र दिलें असून पुढें रवींद्रबाबूंच्या बंगाली 'शान्तिनिकेतन' वाङ्मयापैकीं ३७ लहान लहान व चटकदार चुटकेवजा लेख दिले आहेत व रवींद्रबाबूंच्या वाङ्मयाची चुणूक यावरून महाराष्ट्रीयांस कळून येईल... "

३ लोकसंग्रहः--( २०-४-२३ ) " ... बंगाली वेदांतवाङ्मयाचा परिचय करून देण्याचें कार्य वरील गृहस्थांनीं पत्करलें आहे, हें स्तुत्य आहे. पुस्तकाचे प्रारंभीं रवींद्रांचें रम्य व बोधपर चरित्र देवून नंतर त्यांच्या शान्तिनिकेतन मालेच्या पहिल्या भागाचे, सदतीस निरनिराळ्या प्रकरणांचें भाषांतर दिलें आहे. वेदांतवाचनाची गोडी असणाऱ्यांनीं हें पुस्तक अवश्य वाचून पहावें... "

४ इंदुप्रकाशः—( २४-४-२३ ) "... रवींद्रनाथ टागोर यांच्या शान्तिनिकेतन मालेचा अनुवादरूपानें मराठी भाषेंत प्रसार करण्यासाठीं ही माला जन्मास आली आहे. थोर विभूतींच्या गुणाबद्दल आदरभाव दाखविणें योग आहे ... मलपृष्टांवर डॉ. टागोर यांचा 'फिलासॉफिकल मूड' मधला फोटो दिला आहे ... एकंदरींत पाहतां पुस्तक चांगलें आहे... "

५ संजीवनः—( एप्रिल १९२३ ) "... सध्यांच्या जगांतल्या एका नामांकित किंबहुना, अद्वितीय कवीच्या प्रभावशाली लेखणीचें हें एक बाळसेदार अपत्य आहे, एवढें सांगितलें म्हणजे त्याच्या सुंदरपणाचें निराळें वर्णन देण्याची आवश्यकताच नाहीं. असें चांगलें वाङ्मय मराठींत आणण्याचा श्रीयुत, चव्हाण यांनीं जो उपक्रम सुरू केला त्याबद्दल आम्ही त्याचें मनःपूर्वक अभिनंदन करितो...महाराष्ट्र रसिकांनीं प्रस्तुत पुस्तकाला जरूर आश्रय द्यावा. ... ..."

६ सोलापूर समाचारः—( १६–५–२३ )“...जगद्विख्यात वंग साहित्य सम्राट व आशिया खंडाचे राजकवी रवींद्रनाथ टागोर यांच्या ‘ शान्तिनिकेतन माला ’ या नांवाच्या ग्रंथांचा मराठी अनुवाद करण्याची प्रशंसनीय कामगिरी ज्ञानमित्र संस्थेनें आपल्या आंगावर घेतली आहे व मालेचा पहिला भाग प्रसिद्ध झालेला आहे. बहुधा कोणत्याही गोष्टीकडे रवींद्रनाथ पारमार्थिक दृष्ट्याच पहात असल्यामुळें त्यांच्या कादंबऱ्या, गोष्टी वगैरेंच्या मराठी भाषांतराप्रमाणेंच त्यांचे हें पारमार्थिक वाङ्मयही मराठींत भूषण स्वरूपच होईल अशी आमची खात्री आहे. रवींद्रनाथांच्या विचारसरणीचे परिक्षण करणें केव्हांही आमच्या सामर्थ्याच्या बाहेरचेच आहे. फक्त हें भांडार फोडून भारवाही हमाल म्हणजे अनुवादक महाशय यांनीं आपली कामगिरी कशी बजावली येवढेच पहावयाचे आहे. पुस्तकाच्या संपूर्ण वाचनानंतर भाषांतर बेमालूम साधले आहे असें आह्मांस वाटते म्हणूच रवींद्र वाङ्मयाच्या सेवाकार्याकरितां, तरी मातृभाषेच्या प्रत्येक अभिमान्यानें या शान्तिनिकेतन मालेस योग्य आश्रय द्यावा अशी आमची शिफारस आहे....”

७ राष्ट्रवीरः—( २९–५–२३ )“... डॉ. रवींद्रनाथासारख्या कविरत्नाच्या उदात्त विचारांची महाराष्ट्रीयांना ओळख करून देण्याचा हा जो उपक्रम झाला आहे तो अत्यंत स्तुत्य आहे. यास्तव महाराष्ट्रीयांनीं शान्तिनिकेतन मालेचे आश्रयदाते होऊन प्रकाशकांना प्रोत्साहन द्यावें अशी आग्रहाची विनंती आहे...”

८ खानदेश वैभवः—( ३०-४-२३ ) "...प्रथम रवीन्द्रनाथ यांचा उत्तम फोटो व चरित्र देऊन नंतर त्यांचें लेखापैकीं ३७ भाग दिले आहेत. हे सर्व वेदांतपर, स्फूर्तीदायक व हृदयंगम असून ते उत्तम साधले आहेत. रवीन्द्रनाथांचें वाङ्मय फार मोठें आहे तें सर्व मराठींत आणून तें महाराष्ट्रास सादर करण्याचे उदात्त हेतुनें ही माला काढिली आहे... "

९ कुलाबा समाचारः—( २-६-२३ ) "...डॉ. रवींद्रबाबूंचे नांव जगद्विख्यात आहे. त्यांनीं बोलपूर येथील शान्तिनिकेतनांत केलेला उपदेश ह्या प्रथमभागांत अनुवादकांनीं मराठींत आणला असून तो वाचनीय आहे... "

१० तरुणभारतः—( एप्रिल १९२३ ) "...या मालेचा पहिला भाग परीक्षणाकरितां आमच्याकडे आलेला आहे व वंग कविरत्न डॉ. रवींद्रनाथ टागोर यांच्या अमोलीक वाङ्मयाचा मराठी वाचकांस आस्वाद मिळवून देण्याचा मालाकारांचा उद्देश असून या भागांत रवीन्द्रनाथांचें संक्षिप्त चरित्र व त्यांनीं शान्तिनिकेतनांतील ब्रम्हमंदिरांत केलेला धर्मोपदेश आला आहे...रवींद्रनाथ बाबूंच्या काव्याचा ओघ अमोघ असून त्यांनीं आपल्या विचार कुसुमांनीं जगाला मोहून सोडलें आहे. या भागांत आलेला धर्मोपदेश निःसंशय श्रेयस्कर आहे... कारण या पुस्तकांनीं मराठी वाङ्मयांत उच्च विचारांची भर पडणार आहे... ..."

११ शुभसुचकः—( २५–५–२३ ) "... यांत प्रथम डॉ. रवींद्रनाथांचें जीवनवृत्त दिलें असून पुढें त्यांनीं निरनिराळया विषयांवर वेळोवेळीं केलेल्या उपदेशांचे ३७ लहान लहान चटकदार लेख आलेले आहेत, ते मननीय आहेत... "

१२ ज्ञानसागरः—( ७–५–२३ ) "... या भागांत प्रथमतः डॉ. रवींद्रनाथ टागोर यांचें फोटोसह चरित्र दिलें असून त्यानंतर डॉ. रवींद्रनाथ यांनीं निरनिराळया विषयांवर वेळोवेळीं केलेल्या धर्मोपदेशाचे ३७ पाठ दिले आहेत. माला उपयुक्त, ज्ञान देणारी व संग्राह्य आहे... "

१३ लोकमतः—( २७–४–२३ ) "... रवींद्रनाथ टागोर यांनीं बोलपूर येथील आपल्या ब्रह्ममंदिरांत वेळोवेळीं जो धर्मोपदेश केला तो त्यांनीं स्वतः शान्तिनिकेतन नांवाच्या मालिकेंत दिला आहे व प्रस्तुतचें १८४ पानांचें पुस्तक हा त्याचाच अनुवाद आहे. रामतीर्थांचें खडेबोल, विवेकानंदाची वाणी, बेकनचे निबंध असल्या धर्तीवर या पुस्तकांतील छोटेखानी निबंध आहेत. त्या सर्वांचा मथळा वेगवेगळा असला तरी उपपाद्य विषय ईश्वर प्रेम. ईश्वरज्ञान हा एकच असल्यामुळें सर्व लहान थोर मराठी वाचकांस हें पुस्तक वाचनीय झाले आहे. विशेषतः विद्यार्थी व स्त्रिया यांच्या हातांत कादंबऱ्या व नाटके पढू देण्यापेक्षां तत्वज्ञानविषयक बहुमोल विचारांनीं भरलेलें हें पुस्तक त्यांस अवश्य द्यावें... ... "

१४ गुजराथी स्वधर्म--जागृतिः—( १९७९ ज्येष्ठ.) "... आज सवारमां इष्टकार्यथी परवार्म पछी आ अेक सुंदर पुस्तक हातमां आव्युं. आपणा भारत मंडळना प्रिय बंग कविराजरत्न डो. श्रीमान् रवीन्द्रनाथ टागोरनी प्रतिभानुं दर्शन थतां अेकदम कवित्वनुं स्फुरण थयुं आने आगळ वधतां अनेक विषयोना वाचनमां मन तल्लीन थयुं-कविराजे करेला ग्रंथनुं मराठी भाषामां मंडाण बहु सुंदर, सरळ, रसाळ तथा हृदयंगम रीते थयुं छे. लेखना माधुर्यनो स्वाद लेतां कंटाळो आवे नहि अेवी रचना जेवामां आवे छे. अनुवादक अमारा प्रियात्मा, आत्मचैतन्यशुद्धात्मा श्रीयुत, सरस्वतीनंदन छे, जेयो महाराष्ट्रमां ग्रंथ प्रसिद्धिना कार्यमां बहु स्तुत्य भाग लेई रह्या छे. ग्रंथमां सर्व विषयों सुंदर रीते गोठवाया छे. अनुवादकनी आ कृति लोकोने खास उपकारक छे आने लोको तरकथी तेनो सारो सत्कार थशे अेवी आमे आशा राखीअे छीओ.... ...."

१५ चिकित्सकः—( २–५–२३ ) "... जगप्रसिद्ध वंगसाहित्य-सम्राट डॉ. रवींद्रनाथ टागोर यांच्या प्रतिभासंपन्न लेखणींतून उतरलेल्या वाङ्मयाचा आस्वाद महाराष्ट्रीय रसिकांना घेतां यावा एतदर्थ श्री. सरस्वतीनंदन यांनीं कविवर्यांच्या महत्वाच्या ग्रंथापैकीं 'शान्तिनिकेतन' नांवाच्या ग्रंथाचा अनुवाद करण्याचा उपक्रम केला आहे. साहित्यसम्राट म्हणून अखिल दुनियेमध्यें होत असलेला रवींद्रबाबूंचा जयजयकार लक्षांत घेतां, श्री. सरस्वतीनंदन यांचा प्रयत्न स्तुत्य आहे यांत संशय नाहीं... ..."

१६ उदय:—( ८–५–२३ ) "... महाकवि डॉ. रवींद्रनाथ टागोर ह्यांचें चरित्र दिले असून पुढें त्यांनीं आपल्या शान्तिनिकेतन नांवाच्या शाळेमध्यें स्वतः वेळोवेळीं केलेल्या धर्मोपदेशाचे उतारे दिले आहेत. अर्थात् ते वाचनीय आहेत ... "

17 Indian Nationalist--(12-5-23) We welcome this handsome little volnme in Marathi It makes a succes-ful attempt to render in easy flowing attractive Marathi, the select thoughts of Rabiudranath Tagoae. These are collected from his discourses on religion and philosophy in the Brahma-mandir at Bolpur. The selection is progaessive, interesting and varied. In an introduction we find a short life of the poet, intersperoed wiht many apt quotations from his writings. The book ought to command a wide popularity among the Marathi public, and we would suggest that the pubiishers consider the idea of transiatiug the volume into Gujarati. We would particularly recommend as suitable for incorporation into reading texts in our National Schools, the discourses on Doubt, Love, Prayer and Desire. An admirable volume.

१८ संजीवन मासिकः—( जून १९२३ ) " ... जगप्रसिद्ध कविसम्राट रवींद्रनाथ टागोर यांच्या लोकोत्तर " शान्तिनिकेतन " नांवाच्या बंगाली वाङ्मयाचें मराठींत भाषांतर करून त्याचा परिचय मराठी वाचकांना करून द्यावा या उद्देशानें सरस्वतीनन्दनांनीं वरील " माला " सुरू केली आहे. जर्मनीसारख्या जडमतवादी राष्ट्राला देखील टागोरच्या ग्रंथांनीं वेड लाविलें आहे; या भारतीय बंगाली लेखकाच्या ग्रंथांची सर्व सुधारलेल्या जगांत ख्याति झाली असून जगांतील सर्व मुख्य भाषांमधून त्यांच्या ग्रंथांचा अनुवाद करण्यांत आला आहे व येत आहे; मराठी वाचकांस महर्षि टागोरच्या दैवी विचारांचा परिचय करून देण्याचा श्री. सरस्वतीनंदन यांचा प्रयत्न व संकल्प स्तुत्य आहे... "

यांशिवाय मराठी, इंग्लिश, हिन्दी, गुजराथी वर्तमान पत्रांचे व मासिकांचे उत्तेजनपर अभिप्राय प्रसिद्ध होत आहेत.

प्रो. शान्तिनिकेतन-माला, शनवार, पुणें-सिटी.

॥ श्रीउद्योगदेवता प्रसन्न. ॥

जगद्विख्यात, वंगसाहित्यसम्राट आशियाखण्डाचे राजकवी
रवीन्द्रनाथ टागोर, के टी. डॉक्टर ऑफ लिटरेचर
यांच्या खास परवानगीनें प्रसिद्ध होणारी

# शान्तिनिकेतन माळा.

## भाग दुसरा.

अनुवादक,
श्रीयुत, सरस्वतीनंदन,

जून, सन १९२३.

कागदी बांधणी एक रुपया. ] किंमत [ कापडी बांधणी सव्वा रुपया.

( All Rights reserved by the Publisher. )

प्रकाशक—
रा. नारायण बळवंत चव्हाण,
शान्तिनिकेतन कचेरी,
नारायणाश्रम.
शनवार पेठ, घ. नं. ४८३, पुणें शहर.

## शान्तिनिकेतनच्या तिसऱ्या भागांत येणारे विषय.

वंगीय साहित्य रत्न डॉ. रवीन्द्रनाथ टागोर. यांचे वडील महर्षि देवेन्द्रनाथ यांचे अत्यंत उज्वल व रसभरित चरित्र आणि वंग भाषाभिज्ञ श्री. वासुदेवराव आपटे यांच्या तेजस्वी लेखणींतून उतरलेले शान्तिनिकेतन व भक्तवाणी लेखमालेंतील अत्यंत स्फूर्तीदायक व भक्तिरसानें ओथंबलेल्या लेखांचा अनुवाद येणार आहे. शिवाय महर्षि देवेन्द्राचा व रवींद्रनाथांच्या बालपणाचा असे दोन फोटोही येणार असल्यामुळें हा तिसरा भाग सर्वांगसुंदर असा निघणार आहे.

प्रो. शान्तिनिकेतन, पुणें-सिटी.

मुद्रक,
रा. नारायण बळवंत चव्हाण,
हरिहर प्रेस.
४८३, शनवार पेठ, पुणें शहर.

क्र. 23६७

# शान्तिनिकेतन मालेचें मार्गक्रमण.

भगवंताच्या कृपेनें व जनतारुपी जनार्धनाच्या सहाय्यानें आज शा न्ति नि के त न मालेचा हा दुसरा अंक जनतेच्या चरणीं सप्रेम अर्पण करण्याचा सुयोग आलेला पाहून विशेष आनंद होत आहे. पाहिला भाग प्रसिद्ध झाल्यानंतर ज्या सूचना करण्यांत आल्या त्यांचा आमच्या परिस्थितीनुरूप योग्य तो विचार करून याभागांत शक्य त्या सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आहे; तथापि याही भागांत कांहीं दोष शिल्लक राहण्याचा संभव आहे. त्याबद्दल आमचे सहृदय वाचक आम्हांस क्षमा करतील अशी आशा आहे.

मालेच्या बाहिरंगांत सुधारणा करणे हें सर्वस्वी मालेच्या सांपत्तिक परिस्थितीवरच अवलंबून आहे ती सुधारण्यास मालेला लोकाश्रयाची अत्यंत जरूरी आहे. जसजसा लोकाश्रय वाढत जाईल तसतसें बाहिरंग अधिकाधीक मोहक करण्याचा आम्हीं निस्वार्थ बुद्धीनें प्रयत्न करूं.

मालेच्या अंतरंगासंबंधानें विचार करतां त्यांत ही सुधारणा होणें अत्यंत आवश्यक आहे असें आम्हांस आढळून आलें; म्हणून बंगाली भाषाकोविद आमचें मित्र व लोकप्रिय ‘ आनंद ’ मासिकांचे संपादक श्रीयुत, वासुदेवराव आपटे, बी. ए. यांच्या पुढें आम्हीं आपल्या मालेची योजना मांडून ह्या वाङ्मय सेवेच्या कार्यांस मदत करण्याची आग्रहानें विनंती केली व ती त्यांनीं प्रेमानें मान्य करून शान्तिनिकेतन मालेच्या तिसऱ्या भागाच्या कार्यांस सुरवात करून

आम्हांस मालेच्या अंतरंगाच्या काळजींतून मुक्त केलें ह्याबद्दल त्यांचे आभार जितके मानावेत तितके थोडेच आहेत.

ह्याशिवाय आमचे सन्माननीय मित्र व 'विहारी' पत्राचे माजी संपादक श्रीयुत, दामुअण्णा चिपळुणकर, बी. ए. यांनीं व भारतीय साहित्य–मंदिराचे उत्साही चालक आणि शारदा मासिकाचे होतकरू संपादक श्रीयुत, केशवराव काशीकर यांनींही प्रेमभावानें यथाशक्ती व यथामती निस्वार्थ बुद्धीनें सहाय्य करण्यास सुरू केलें, ह्याबद्दल त्यांचे येथें अभिनंदन करणें अत्यंत जरूर आहे. त्याचप्रमाणें रवींद्रांच्या वाङ्मयाशी तन्मय झालेल्या महाराष्ट्रांतील लेखक वर्गानेंही मालेला वेळींच इच्छेनुरुप सहाय करावें अशीं त्यांस सप्रेम विनंती आहे.

अशा रितीनें सर्व बाजूंनी सुधारणा केलेला मालेचा तिसरा अंक पुढील तिमाहींत आश्रयदात्यांच्या सेवेस सादर करण्यांत येईल. त्याचा ते प्रेमानें स्विकार करून उत्तेजन देतील अशी आशा आहे.

मालेच्या सांपत्तिक स्थितीकडे पहातां ती अत्यंत शोचनीय आहे आम्ही आपल्याकडून शक्य तितक्या धडाडीनें प्रयत्न करीत आहोंत; परंतु ते सफल होण्यास मालेला लोकाश्रयाची अत्यंत जरूरी आहे. ही जरूरी महाराष्ट्रांतील रसिक व गुणग्राहक जनतेला वेळींच उदार आश्रय देवून दूर करण्याची सद्‍बुद्धि तो जनार्दन देवो अशी त्याचे चरणी प्रार्थना करून हें मार्गक्रमण येथेंच संपवितो.

नारायणाश्रम. 
ता. १०–७–१९२१.

भवदीय,
प्रो. शान्तिनिकेतन.

शान्तिनिकेतन माला भाग २ रा.

दा. क्र. 2360

# स्वराज्य आणि रवींद्रनाथ.

# स्वराज्य आणि रवींद्रनाथ.

परदेशांत जेव्हां स्वराज्याविषयीं वाद सुरू झाले तेव्हां आमच्याकडे त्याचें अनुकरण होऊं लागलें. आम्हांलाही 'स्वराज्य' पाहिजे असा ध्वनि निघूं लागला. आजपर्यंत आमच्या इकडे धर्मासाठीं तंटे झाले. बाकी कोणत्याच गोष्टी आम्हांला ठाऊक नव्हत्या. धर्मासाठीं मात्र आमच्या इकडे पुष्कळच रक्तपात झाला. हिंदुमुसलमानांच्या लढाया झाल्या. हिंदुहिंदूत देखील न्यायासाठीं अनेक युद्धें झालीं; पण सर्वांच्या मुळाशीं धर्म होता. केवळ धर्मासाठीं आमचे लोक जिवांवर उदार झाले; पण युरोपमध्यें मात्र संपत्तिसाठीं व अधिकारासाठीं अनेक तंटे झाले. तिकडे प्रत्येक खात्यांतील लोकांना आपले अधिकार माहित आहेत, तेव्हां संप दंगे हे नेहमीं चालू असतात. हे तंटे मोठ्या युक्तिनें मिटवावे लागतात. याकरितां नवें कायदे करावें लागतात व असलेले कायदे फिरवावे लागतात अगर रद्द करावें लागतात. अशा वेळीं दोन पक्ष होतात. एका पक्षानें दंगा करावा व हक्क मागावे; पण दुसऱ्या पक्षानें तडजोड करून तंटा मिठवावा.

एके वेळीं इंग्लंड आणि स्कॉटलंड यामध्यें विरोध होता. प्रत्येकाची भाषा, विचार व रुचि भिन्न होती, परंतु आज तसा विरोध

उरलेला नाहीं. कारण सध्या ते दोन्ही देश एका शासनाखाली आहेत. संपत्तींत आणि विपत्तींत दोघेजण एक दिलानें झटतात; पण ही गोष्ट आयर्लंडाशीं जुळत नाहीं. याचें कारण हेंच कीं अधिकारी लोकांची असमानता होय.

आमच्याकडेही हिंदुमुसलमानांत विरोध वाढत आहे. जेव्हां सत्याकडे कानाडोळा केला जातो तेव्हां अपराध होतात आणि जेथें अपराध होतात तेथें शासन केलें पाहिजे. जेव्हां अध्यात्मिक बाजूनें धर्मांचा विचार केला जात नाहीं आणि केवळ बहिर्मुख दृष्टी असते, तेव्हां लोकांत अस्वस्थता उत्पन्न होते. ज्या आचाराविचारांचा धर्माशीं संबंध पोहोंचत नाहीं त्यांच्याबद्दल मतभेद व्हावा व त्यामुळें शांतता मोडावी यात नवल नाहीं. धर्माकडे बाह्यदृष्टीनें बघितल्यावर लोकांमध्यें रक्तपात व्हावें हे रास्त आहे. या गोष्टी बंद करण्याला मुळांत अहिंसा पाळली पाहिजे; परंतु धर्मांच्या नांवाखाली कित्येक जण पशूंचा वध करतात; तर कोणी माणसांचा संहार करतात. हा केवळ अत्याचार आहे. जेव्हां सूक्ष्म विचार होत नाहीं तेव्हां धर्मांबद्दलच काय पण परमेश्वराबद्दलही भांडण होतें.

एकदां मी रेल्वेमध्यें प्रवास करीत असतांना माझ्या कंपार्टमेंट-मधील कांहीं मंडळींचा देशाच्या बाबतींत वादविवाद सुरू झाला. तेव्हां तेथें असलेला एक इंग्लिशमन "म्हणाला जर तुम्हांला आपआपसांतील

तंटे अद्याप मोडता येत नाहींत तर तुम्हीं स्वराज्याबाबत काय वाद करतां ? स्वराज्याला लायक होण्याचे हे उपाय नाहींत. प्रथम तुमच्यांत एकमेकांविषयीं प्रेम झालें पाहिजे. बांधवांच्या अपराधाना क्षमा केली पाहिजे. कोणाचें तरी शासन पाळलें पाहिजे. जूट केली पाहिजे. कारभाराचा बोजा डोक्यावर घेतां आला पाहिजे. जर आपलें अंग आपल्याला उचलतां येत नाहीं तर दुसऱ्यांनीं दिलेली कामगिरी कशी बजावता येईल ? " साहेबांचें भाषण आटोपल्यावर मी म्हणालों " आपण ठीक बोललांत. आम्हीं स्वराज्याला लायक कां नाहींत ? जी अशांतता प्राप्त झाली आहे ती काय ईश्वर दूर करील ? स्वराज्य हें काय समुद्रापलीकडील स्वप्न आहे ? मी बोलतों याबद्दल क्षमा करा. हिंदु मुसलमानांत जो तंटा आहे तो स्वराज्य कोणाला पाहिजे याबद्दल नाहीं. आमचे तंटे वेगळेच आहेत. स्वराज्य दोघांनाही पाहिजे; पण स्वराज्याबद्दल उपाय एकाच्या हातात आहेत व त्याला प्रतिकार दुसरा करीत आहे. दुसऱ्याच्या हातीं तरवार देऊन लढाई कशी होईल ? आमचें म्हणणें हें आहे कीं आमच्यांतील लहानसहान वाद आमचे आम्हीं पाहूं; पण आमची स्वराज्याची मागणी एक मुखी आहे. "

" आम्हांला शिकवण असल्या प्रकारची आहे कीं, आमच्यावर जबाबदारी मुळींच पडूं नये. जर आमच्या अंगावर एखादें काम टाकलें नाहीं तर तें आम्हांला कसें यावें ? आमच्या रक्षणाची जिम्मे-

दारी सरकारनें घेतली आहे; पण आमचें आम्हांला केव्हां रक्षण करता यावें ? यायोगानें आम्हीं दिवसेंदिवस पंगु बनत चाललों आहोंत. आमच्यांतील एक एक गोष्ट निघून जात चालली आहे. कोणत्या गोष्टीला काय करावें हें आम्हांला समजेनासें झालें आहे. आमची फार हीन अवस्था होऊन गेली आहे. जर आमच्यावर कोणतेंच काम टाकलें नाहीं तर मग हिंदूंनी तरी कोणते काम करावयाचें व मुसलमानानींही कोणते करावयाचें ? जर एकालाच उचलण्याला कांहीं ठेवले नाहीं तर मग दोघे मिळून कोणता बोजा उचलणार ? ज्यांच्या आंगांत ताकद नाहीं व ज्यांच्या हातीं शस्त्र नाहीं अशांच्या बडबडीचा तरी कितपत उपयोग होणार ? "

इंग्रजी राज्यांत सर्वांवर एक शासन आहे आणि आम्हीं सर्व ऐक्यभावानें वागत आहोंत हें म्हणणें केवळ ढोंग आहे. सरकारच सर्वांना आळा घालीत आहे. पूर्वीं आमची जन्मभूमी म्हणजे ज्या गांवांत आमचा जन्म होईल तीच. यापेक्षां आमची विस्तृत भावना नव्हती. हिंदुस्थान आमचा मायदेश आहे अशी आमची भावना नव्हती. आमच्या देशांत लहानसहान प्रांतावर राज्य करणारे बहुत राजे होऊन गेले; पण मोठें कसे व्हावे हे आम्हांला कोणी दाखवीलें नाहीं. पूर्वीच्या लहान गांवांत कोणी आपला डौल मिरवावा. अधिकार गाज-वावा. त्याच गांवांत आपलें ज्ञान दाखवावें. असा प्रकार चालत

असे; पण आजची गोष्ट तशी नाहीं. आज लहान गांवांत आपल्या कर्तबगाराचा आनंद मानून भागत नाहीं. तसा आनंद मानून आमचा समाज खालावत गेला. सरकार आमचें रक्षण करतें. आम्हांला शासन देतें. आमच्यांत शांतता राखतें आणि कायदाही करीतें पण जें पाहिजे तें आम्हांला मिळत नाहीं. ब्राम्हणाला पै पैसा दक्षणा मिळते पण मोफत शिक्षण मिळत नाहीं. जमीनीचा सारा वसूल केला जातो पण जमीन कशी सुधारावी इकडे कोणाचें लक्ष जात नाहीं. मोठे लोक गरिबांकडून मानमरातब घेतात; पण त्यांचें रक्षण त्यांच्यांकडून होत नाहीं. जातीभेदानें कोणी आपल्या जातीला उच्च समजून अन्य जातीला नीच समजतो. गाईनें दूध देण्याचें नाकारलें, पण लाथ झाड-ण्याचें कार्य कायमच ठेवलें आहे. माणसें जर दगडाचे चिरे असते तर ते एकावर एक रचून त्यांचा सुंदर मनोरा तयार करता आला असता; पण ही गोष्ट तशी नाहीं. मनुष्य हा कांहीं दगड नाहीं. त्याचा उप-योग वेगळा आहे. मनुष्याला दगडाप्रमाणें ठोकणें म्हणजे त्याचा जीव घेणें होय. मनुष्याला राजनिष्ट व देशभक्त करावयाचें म्हणजे त्याला वेगळें शिक्षण दिलें पाहिजे. कोणाच्या तोंडचा घास घेऊन आम्हीं आपला संसार सुखाचा करावा अशी: आमची इच्छा नाहीं. आम्हांला तरवार मिळाली तर आम्हीं सैतानाप्रमाणें वागूं. अशी आमची इच्छा नाहीं.:आम्हीं जर कांहीं मागत असलों व आमची

जर कांहीं इच्छा असली तर आम्हांला आमच्या देशाची कल्पना यावी व आम्हीं त्याची सेवा करावी. देशाला सुखी करावें, लोकांची उन्नति व्हावी व राजसेवा घडावी हेंच आमचें पहाणें आहे. ज्याचें काम त्याला जरूर करूं दिले पाहिजे. यायोगानें कार्य करण्याची उत्सुकता येते. नाहीं तर मनुष्याच्या अंतरिकभावना दाबून टाकल्यास उलट त्याला विकार जडतो व तो रोगी बनून निकामी होतो. अशा मनुष्याला पाहून त्याच्या जवळपास असणाऱ्यांचा उत्साह मोडतो एवढेंच नव्हे तर त्यांच्यांतील काम करण्याची शक्तिही दिवसें दिवस नाहींशी होत जाते.

दुसरी गोष्ट अशी कीं, स्वार्थी लोक बेइमानी बनतात आणि उदासीन राहणारे लोक आळसाला बळी पडतात.

आणखी तिसरी गोष्ट अशी कीं, जरी अधिकारीवर्गांनीं लोकांना शद्ब उच्चारूं दिले नाहींत, विचार करूं दिला नाहीं, एवढेंच नव्हे तर उलट याबद्दल शासन केलें. तरी आमच्यांतील मूलभूत असलेले गूण केव्हांही नष्ट होणार नाहींत. चैतन्याला प्रेतात्मा बनविता येणार नाहीं. ही गोष्ट सरकारच्या ध्यानांत आल्यावर स्वराज्याचा मसुदा तयार होऊं लागला. नुसती धाक दडप करून भागत नाहीं. ही गोष्ट सरकारच्या लक्षांत आली आहे. आपण कांहीं औदार्य दाखविलें पाहिजे असें त्यांला वाटलें.

# स्वराज्य आणि रवींद्रनाथ.

आम्हीं मनांत विचार केला कीं, आम्हीं आजपर्यंत देशाची जी सेवा केली त्या तपाचें हें फल आहे. असा अनुभव आल्यामुळें आमचा उत्साह द्विगुणित झाला.

सरकारला असें वाटलें कीं, ज्या देशावर राज्य करावयाचें त्या देशांतील लोकांना निर्बल ठेवून उपयोगाचे नाहीं. हा एक अडथळा आहे. वाऱ्याच्या योगानें नौका चालते; पण तुफान झालें कीं, नौका बुडते. तरी या गोष्टीचा शांततेनें विचार झाला पाहिजे. केवळ दांडगाई करून चालणार नाहीं. जर सरकारच्या मंत्रीमंडळांत कोणी विचारी लोक नसते तर मग स्वराज्याचा ध्वनि उठला नसता.

ज्या मनुष्याला भविष्यकाळ दिसत नाहीं तो अंधळा आहे. त्या मनुष्याला भविष्यकाळ न समजल्यामुळें तो स्वतःला दुर्बल समजतो.

आजपर्यंत हिंदुस्थान म्हणजे एक व्यापाराची जागा आहे असें समजलें जात असे. येथें माणसें आहेत हें कोणाच्या लक्षांत आलें नाहीं. हें एक चरण्याचें कुरण आहे असेंच समजत.

आजपर्यंत लंडन पार्लमेंटमध्यें इंग्रजांच्या सुखदुःखाचा कायतो विचार झाला; पण आतां हिंदुस्थानच्या दुःख निवारणार्थ काय करावें याची वाटाघाट चालू आहे. ज्यावेळीं वातावरण स्थीर आणि शांत झालें त्यावेळीं ही गोष्ट दिसूं लागली. या पूर्वीं कुंद आणि क्षुब्ध वातावरणांत कोणालाही हिंदुस्थानचा आजमास करतां आलेला नाहीं.

त्यावेळीं फोटोग्राफरला फोटो काढावयाचा असतो त्यावेळीं त्याच्या-समोर जेवढें दृश्य असतें तेवढेंच निघतें. बाकी भाग अस्तित्वांत असूनही निघत नाहीं. आमच्या दुर्भाग्यानें इंग्रज सरकार हे समुद्रा-पलीकडे रहात आहे. त्यांच्या दृष्टींच्या टापूंत सगळें हिंदुस्थान येत नाहीं. कधीं बादशहा इकडे आले तर त्यांचा मुक्काम फार थोडा वेळ असतो व त्यांच्या भोंवती भलतेंच मंडळ गर्दी करतें.

आमची गोष्ट अनाथगृहासारखी झालेली आहे. घर नाहीं म्हणून भागत नाहीं व तें आहे म्हणावें तर ज्या सोयी आम्हांला पाहिजेत त्या होत नाहींत. आश्रयासाठीं एकानें दुसऱ्याजवळ जावें तर तोच त्याला गट्ट करतो. आमच्याकडे घर कशाची वाढ झाली असेल तर रेल्वेलाईनी; पोलीसांची संख्या कैद्यांची भरती यांची होय. न्यायसत्यता आणि स्वातंत्र्य हें इंग्रजाचें मुख्य ध्येय. हें ध्येय त्यांनी नुकत्याच झालेल्या लढाईच्यावेळीं प्रगट केलें आहे. अपमानांत आयुष्य घालविण्यापेक्षा आत्माभिमान दर्शित करण्याला सध्यां सरकाराला कष्ट सोसावे लागत आहेत. जी गोष्ट एकाला तीच गोष्ट दुसऱ्याला. आम्हांला स्वराज्याचे हक्क देण्यासाठीं मे. मॉंटेग्युसाहेब इकडे येण्यास निघाले; पण ते इकडे येत असतांना कित्येक सभासदांना मोठा घुस्सा आला. तथापि लॉर्ड रिपन साहेबांसारखे कांहीं दयाळु आहेतच.

माझा माझ्या देशबांधवाना असा सवाल आहे कीं, तुम्हीं जें आज स्वराज्याची मागणी करीत आहांत तें तुम्हीं स्वतःच्या प्रेरणेनें कां दुसऱ्याच्या उठावणीनें ? माझें म्हणणें असें आहे कीं तुम्ही दुसऱ्यावर अवलंबू नका. तुम्ही आपल्या स्वतःच्या बलावर विश्वास ठेवा. तुमचा धर्म जर तुम्हांला प्यारा आहे. तर मग तुम्ही धर्मावर भरंवसा ठेवा. तुमच्या इच्छेशिवाय तुम्हांला दुसरें कोणी दुःख भोगावयाला लावण्यास समर्थ नाहीं. सत्यावर, न्यायावर, लोकोपकारावर तुम्हीं आपली भिस्त ठेवा. अशी कोणती वेळ येऊन ठेपली आहे कीं आपल्या स्वराज्याच्या मागणीनें सरकारावर एक धोंड पडली आहे ? सरकारला आपल्या कसोटीस लावूं द्या. सोनें तापविल्याशिवाय अलंकार होत नाहीं. जाळण्याच्या योगानें नाश होत नाहीं तर तें जास्त तेजस्वी बनतें. पहा, देशभक्तिचा उज्वल प्रकाश पडत चालला आहे. त्यांत दंगेधोपे, खून, दरोडे राजद्रोह या गोष्टी दिसाव्या कां ? आपण ईश्वराची प्रार्थना करावी कीं ' हे देवा, आम्हीं देशसेवा करीत असतांना सरकारला आमचा अविश्वास वाटूं देऊं नकोस. " आमच्यांत देशभक्ति बरोबर राजभक्तिही आहे.

आमची बालगोपाल मंडळी देशभक्ति करीत असतांना पोलीस त्रास देतात. एखाद्या कुरणांत ज्या प्रमाणें जनावर सुटावें व तेथील गवताला त्याचा दांत लागतांच त्याची वाढ खुंटावी याप्रमाणें पोलीसांचें करणें होतें. जी आमची तरुण मंडळी देशसेवा करित आहे त्याना

पोलीसाकडून धक्का बसतांच त्यांच्याकडून पुढें देशसेवा होत नाहीं. ते कोणतीही गोष्ट करण्यास भितात. यामुळें त्यांच्याकडून देशसेवा व राजसेवा कमीच होते.

एकदां माझ्या शान्तिनिकेतन मधील कांहीं विद्यार्थी कलकत्त्यास परिक्षेसाठीं गेलें असतांना त्यांच्या नांवांची नोंद पोलीसांनीं केली. हें असें करण्याचें कारण काय तें मला कळलें नाहीं. कारण, पोलीसांचें सगळें रेकार्ड गुप्त असतें. मात्र या योगानें एक होतें कीं, ज्याप्रमाणें सापानें खाल्लेलें फळ कोणी खात नाहीं त्याप्रमाणें पोलीसांनीं ज्यांची नोंद केली त्यांच्याशीं इतर मंडळी आपला संबंध ठेवीत नाहींत. कोणी त्यांच्याशीं भाषण करीत नाहींत व त्यांच्यापासून दूर दूर राहतात. ज्याप्रमाणें दुराचारी मनुष्याला सात्विक मनुष्य आपली मुलगी देत नाहीं; त्याप्रमाणें देशभक्तांना देखील आपली मुलगी कोणी देण्यास धजत नाहींत. असा नाहक कटाक्ष देशभक्तावर आहे. देशभक्तानें व्यापार करावा तर तो धड चालत नाहीं. त्यानें भिक्षा मागावी तर त्याला कोणी भीक वाढत नाहीं. कारण सरकारनें ज्याला दूर केलें त्याला मदत करावयाला जणता भिते. असा चोहों बाजूंनीं देशभक्तांचा कोंढमारा झालेला आहे. ज्या कामांत देशभक्तानें हात घातला त्याचा नाश होतो. कारण त्या कृत्यांत लक्ष घालण्यास कोणाला धीर होत नाहीं. अशा रीतीनें देशभक्त म्हणजे एक निकामी मनुष्य होतो. ज्या-

प्रमाणें अंधेरांत साप साप म्हणून दोरीला बडवावें त्याप्रमाणें संशय बाधेनें देशभक्तांचा छल होत आहे. हरएकांचा वहिम धरावा हा पोलीसांचा शिरस्ताच झाला. पोलीसांत जाणें म्हणजे संशयखोर बनणें होय.

ज्यावेळीं पोलीसांत नोकरी धरावयाची त्याचवेळीं संशय घेऊन चालावें हा नियम पाळावा लागतो. हा नियम जो कोणी पोलीस पाळणार नाहीं तो नालायक ठरणार. त्यांत एक गोष्ट अशी आहे कीं, संशयी राहणें हा पोलीसांचा स्वभाव नाहीं. तीं इतराप्रमाणें माणसेंच आहेत; पण ते जो वेष घेतात त्याची त्यांना बतावणी करावी लागते.

माझी अशी इच्छा आहे कीं, शान्तिनिकेतनमधील विद्यार्थी मंडळीना विश्वाचा इतिहास समजला पाहिजे. त्यांत निर्मल ज्ञान प्राप्त झालें पाहिजे. त्यांत मत्सर नसला पाहिजे.

आम्हांला जें चांगलें वर्तन करावयाचें तें आम्हीं क्षेत्राच्या ठिकाणीं करतो; पण तसें नाहीं. आमचे बाह्य व अंतर शुद्ध पाहिजे. येथें आणि तेथें असें आमचें नसलें पाहिजे. आम्हीं सदा सर्वकाळ चांगलें वर्तन ठेविलें पाहिजे. आम्हीं प्रेमासाठीं, धर्मासाठीं व ईश्वरप्राप्तीसाठीं टाहो फोडला पाहिजे.

ज्याच्याजवळ आपल्यासारखें बल नाहीं त्यांच्याशी कुस्ती खेळणें बरोबर नाहीं. आमची सारी बाजू अध्यात्मिक विचाराकडे आहे; पण तिकडे तर कोणाचेंच लक्ष जात नाहीं. ही आमची अध्यात्मिकता

कोणालाही पसंत नाहीं. दुसऱ्यांना ती पसंत नसली म्हणून आम्हीं ती सोडतां कामा नये. आमची जी उन्नति तीच आमच्या देशाची उन्नति होय आणि जी देशाची उन्नति तीच आमची असें आमचें पाहणें नाहीं. असल्या देशाची भरभराट कांहीं काळ राहील पण ती केव्हांही चिरकाल टिकणारी नव्हे.

आपल्या धर्मात दोन मार्ग सांगितले आहेत. एक श्रेयोमार्ग व दुसरा प्रेमोमार्ग. त्यापैकीं आपण सर्वांनी श्रेयोमार्गाचें अवलंबन केले पाहिजे. श्रेयोमार्ग हा निरंतर सुख देणारा आहे व प्रेमोमार्ग हा तात्कालिक सुख देतो. मनुष्य हा तात्कालिक सुखाला भुलतो. त्याला श्रेयोमार्ग हा अडचणीचा वाटतो. दोन्ही मार्ग एकमेकाच्या जवळ जवळच आहेत; पण श्रेयोमार्गाची व्याप्ति प्रेमोमार्गापेक्षां फार मोठी आहे. आपण आपल्या बायकामुलांवर प्रेम करणें हा प्रेमोमार्ग होईल; पण जर आपण सकल मानव जातीवर प्रेम केलें तर तो श्रेयोमार्ग होतो. दोन्हीमध्यें प्रेम आहेच; पण एका प्रेमांत कांहीं तरी फेडीची अपेक्षा आहे व दुसऱ्यांत पूर्ण निर्हेतुकपणा दृष्टीस पडतो. प्रेमोमार्गांत अप्पलपोटेपणा आणि स्वार्थ भरलेला आहे व श्रेयोमार्गांत केवळ परमार्थच भरून उरलेला आहे. प्रेमोमार्गांत जो गुण संपादन होतो तो दुर्गुणाचें फल देतो; पण श्रेयोमार्गांतील गुण हा मानव जातीचा खरा उद्धार करतो. आपण नकलीपणाच्या नादी लागून मोठ्या फलाला

मुकतो. आपल्याला धीरच पोंचत नाहीं. आपण उतावळे झालेले असतो. याच एका गोष्टीनें निष्काम कर्माला महिती आलेली आहे. सर्वांच्या हातूंन कर्म होते; पण स्वार्थावर होणारी कर्मे फलदायक होत नाहींत. तीं त्यांच्या बरोबरच निघून जातात. मनुष्यानें केलेल्या श्रेयोमार्गांतील कर्मेंही प्रपंचालाच काय पण देशाला-जगाला-फलदायक होतात. म्हणूनच श्रेयोमार्गी हा साधु समजला जातो व प्रेमोमार्गांतील व्यक्तीला प्रापंचिक म्हणतात. ज्याप्रमाणें हंस हा दुधातलें पाणी वेगळे करतो त्याप्रमाणें आपण आपल्या कर्मांची निवड केली पाहिजेत. बक्षीसाच्या आशेनें भलतेंच कर्म आपल्या हातून होतें. इनाम मिळणार म्हणून आपण एखादे वेळीं फितुरी बनतों; पण तें कामाचें नाहीं.

वरील दोन्ही मार्गांत एकीकडे ज्ञान आहे व दुसरीकडे अज्ञान आहे. ज्याला खरी आत्मप्राप्ति व्हावी असें वाटतें तो मनुष्य विषयाचें चिंतन करीत नाहीं; पण प्रेमोमार्गांतील वेडा मनुष्य लहान सहान सुखाकरतां झगडतो. जरी दोन्ही मनुष्यें या भवचक्रांत सांपडलीं आहेत, तरी श्रेयोमार्गी हा आपल्या शहाणपणावर व इच्छाशक्तीच्या जोरावर आपण कोणत्या कर्मांचा स्वीकार करावा हें ठरवीत असतो. आत्मा व अनात्मा हे परस्पर विरोधी आहेत. त्यांच्यांत प्रकाश व अंधःकार याप्रमाणें भेद आहे. एक मनुष्य अभिमानाची वाढ करीत असतो व दुसरा मनुष्य आपला अभिमान घालवून टाकण्यासाठीं यत्न

करीत असतो. अभिमान वाढल्यानें फक्त आपल्या प्रपंचाचेंच महत्व वाढतें; पण तोच अभिमान वगळला असतां सर्वत्र प्रीति पसरून देशाचें कल्याण करण्यास त्याची चांगलीच मदत होतें.

मी श्रेय आणि प्रेम तसेंच ज्ञान व अज्ञान या विषयीं जें सांगितलें. याचप्रमाणें विद्या व अविद्या आहे. ज्या माणसाला मी पंडित व शहाणा असें वाटत असतें तो देशाला कुचकामाचा. कारण त्याचा शहाणपणा व पांडित्य हे फक्त व्यक्तिपुरतें असतें; पण जो सर्वांना शहाणे करण्यासाठीं झटतो तो खरा विद्वान होय. आपण ढेकर दिल्यानें जगाचें जेवण होत नसतें. अज्ञानी माणसाचें हें लक्षण आहे कीं, त्याला कांहीं वेळ दुःख दिसलें नाहीं कीं तो त्याला सुख समजतो. त्याला सुख म्हणजे काय याची खरी ओळख होत नसते. असा हा मनुष्य भाग्यशाली म्हणावा कां दुर्दैवी म्हणावा बरें? ज्यानें आपल्याला अंधारांत कोंडून घेतलें आहे त्याला प्रकाश दिसत नाहीं व प्रकाश सहनही होत नाहीं. तो जेथें असतो तेथेंच रमतो. त्याला आम्हीं सर्वांच्या सुखाची महति सांगून तरी काय उपयोग? एखाद्या संन्याशा पुढें पैशाचें महत्व गाईलें तरी तो त्याकडे लक्ष देत नाहीं. याचप्रमाणें आमच्या या उच्चतर तत्वाकडे क्षुद्र लोकांनी कानाडोळा करणें रास्त आहे. या ठिकाणीं क्षुद्र म्हणजे मनानें क्षुद्र होत. मग ते स्वकीय असोत कां परकीय असोत. ही मारामारी दोघांनाही दुःख दायकच

ब्राह्मणादिकांचा वर्ग व इतर वर्णांचें स्वातंत्र्य यांना त्या व्यवस्थेनें दूर दूर ठेविले. दुसऱ्या बाजूला सर्व सुखें, सोयी व शिक्षण यांचा प्रचार सर्वसामान्य लोकांत करण्यासाठीं नानाप्रकारचे उपाय करण्यांत आले. यामुळें श्रीमंताच्या धनाच्या उपभोगाचा कांहीं अंश सर्वसाधारण लोकांनाहि मिळूं लागला, आणि सामान्य जनतेला आश्रय देऊन संतुष्ट केल्याचेंहि श्रेय कर्तृत्ववान् नेत्यांना मिळवितां आलें. आपल्या देशांत धनिक वर्ग व दरिद्री वर्ग यांच्यांत केव्हांहि संघर्ष होण्याचें कारण राहिलें नाहीं आणि जे काम करण्यास असमर्थ आहेत अशा लोकांचे जीव वांचविण्यासाठीं विशेष कायदे करण्याचेंहि प्रयोजन पडलें नाहीं.

परंतु ही व्यवस्था नव्या परिस्थितींत टिकाव धरून राहण्यासारखी नव्हती. जगांतल्या इतर राष्ट्रांशीं आमचा संबंध जेव्हां आला, तेव्हां ती व्यवस्था लटपटून अखेर ती नामशेष होण्याचा प्रसंग प्राप्त झाला. मोठमोठे आघात सहन करण्याचे प्रसंग समाजावर वरचेवर आले म्हणजे त्याचीं हाडें खिळखिळीं होतात; त्याला शीण येतो व दार बंद करून आंत स्वस्थ निद्रा घेण्याची त्याला इच्छा होते; पण दारावर सारखे आघात होत असतां स्वस्थ झोप कशी येणार? अशा वेळीं धड झोप नाहीं, धड जागृतावस्था नाहीं, ही स्थिति फार शोचनीय असते. त्यापेक्षां समाज पूर्णपणें जागृत असणेंच श्रेयस्कर

असतें. तीच स्थिति आपल्या समाजाला सध्या प्राप्त झालेली आहे. आपल्या समाजावर आंतून व बाहेरून आघात होत आहेत. लोक दारिद्र्य व दुर्भिक्ष यांनीं पीडले आहेत. जुनी समाजव्यवस्था भंग पावली आहे. संयुक्त कुटुंबांचे तुकडे तुकडे झाले आहेत. ब्राह्मणांचें वर्चस्व नाहींसें झालें आहे. ग्रामव्यवस्थेपैकीं मुख्य जी पंचायत-व्यवस्था तिनें गळ्यांत सरकारसेवेचा पट्टा बांधून आत्महत्या करून घेतली आणि मृत होऊन ती गांवकऱ्यांच्या छातीवर आतां बसली आहे. धनिक लोक आपलीं मूळ गांवें सोडून मोठमोठ्या शहरांतून जाऊन राहिले आहेत, आणि मोटारगाड्या उडवीत आहेत. कुलशीलवान् लोक मुलींसाठीं बी. ए. एम. ए. झालेले वर शोधीत आहेत, आणि त्या वरांच्या चरणीं लोळण घेत आहेत. ही स्थिति प्राप्त झाल्याबद्दल कलियुगाला, परदेशी राज्यकर्त्यांना किंवा इंग्रजी शिकलेल्या देशी लोकांना दूषणें लावण्यापासून कांहीं फलप्राप्ति होणार नाहीं, आतां खरा उपाय म्हणजे हा कीं, सारें जग जें आपल्या दाराशीं आलें आहे, त्याला आदरपूर्वक घरांत घेऊन त्याच्याशीं सलोखा ठेविला पाहिजे. असें आपण केलें नाहीं, तर दार मोडून तें आपल्या घरांत घुसल्याशिवाय राहणार नाहीं.

सारांश, समाजाची पुनर्घटना करण्याची वेळ आली आहे. ती कशी करावयाची याचा विचार अवश्य केला पाहिजे. पाश्चात्यांची नुसती

नकल करून चालावयाचें नाहीं. त्यांच्यापासून शिकायला पाहिजेत त्या गोष्टी शिकाव्या. इतर समाजाचें सत्यस्वरूप कळल्याशिवाय स्वतःच्या समाजाच्या सत्यस्वरूपाचें ज्ञान होत नाहीं. आमचे लोक पाश्चात्य लोकांपासून शाळा व कॉलेजें यांतलें शिक्षण घेऊन तरबेज झाले; पण समाजोपयोगी शिक्षण त्यांनीं घेतलें नाहीं. पाश्चात्यसमाजाचें खरें मूळतत्त्व, त्याचें खरें वीरत्व, समाजाच्या हितासाठीं स्वार्थत्याग करण्याची तयारी, व स्वाभिमान हे गुण अजून आम्हांला शिकावयाचे आहेत.

---

## वर्तमानकालीन रामायण.

पृथक्पणानें राहण्याची मनुष्याची प्रवृत्ति हीच त्याला शत्रूसारखी झालेली आहे. सत्यभावानें परस्परांत मिसळून राहण्यांतच वस्तुतः त्याचें कल्याण आहे. या दोन गोष्टींतल्या विरोधामुळेंच मनुष्याच्या जीवनांत कुरुक्षेत्रावरचें युद्ध चाललेलें आहे. अजून मनुष्य शांतिपर्वापर्यंत जाऊन पोहोंचला नाहीं.

मनुष्यजातीच्या इतिहासांत यापूर्वीं अनेक दुःखकारक घटना होऊन गेल्या आहेत. सत्तेचा व धनाचा लोभ, यांच्याठायीं नररक्तपानाविषयीं जबरदस्त तृष्णा आहे ही गोष्ट सर्वांच्या परिचयाची झालेली आहे. त्यांच्या सुवर्णलंकेंत देवतांच्या हातांत कायमचीच

हातकडी पडलेली आहे. त्यांचीं दहा तोंडें व वीस हात दाहीं दिशांना धर्माची उपेक्षा करण्याच्या उद्योगांत गुंतलेले आहेत. म्हणूनच त्यांच्या स्वर्णलंकेला नेहमीच आग लागलेली असते, ती लंकापुरी अजून जळत राहिली आहे.

सध्याच्या युगांत शास्त्रज्ञानाच्या साह्यानें या शत्रूंनीं दृढ उपकरणें गोळा करून जो जगड्व्याळ गड बांधण्यास सुरुवात केली आहे तसा गड त्यांनीं पूर्वीं कधीं बांधिला नव्हता. या शत्रूंची त्राटिका राक्षसी सरळ व शुद्ध मार्गानें चालणाऱ्या लोकांना ताडण करीत आहे. अखेर एकोपारूपी विश्वामित्राच्या शिष्यांपैकीं कांहींजण 'शांतता हवी, शांतता पाहिजे' असा आक्रोश करूं लागले आहेत. सध्याच्या लंकाकांडानें त्रेतायुगांतल्या लंकाकांडाला मागें टाकिलें आहे.

पण या शत्रूंचें पोषण करूं व शांतताहिं मिळवूं—अशा प्रकारचा धूर्तपणा विधात्याजवळ चालावयाचा नाहीं. चोरीचा माल आणून घरांत भरावयाचा आणि न्यायाधिशापुढें क्षमेची याचनाहि करावयाची हीं गोष्ट देवाच्या दरबारीं मंजूर होणार नाहीं. अखेर राक्षसांच्या मानानें क्षुद्र दिसणाऱ्या अशा मनुष्यशक्तीनेंच त्या राक्षसांचा नाश व्हावयाचा आहे; मात्र ही रामलक्ष्मणांची शक्ति त्यांच्या ठायीं जागृत होण्यास सीता-स्वयंवराची व तिच्या हरणाची अपेक्षा आहे. ही सीता म्हणजे संहति ही होय.

———

## सान्त आणि अनंत.

पुण्यसंचय केल्यानेंच स्वर्ग प्राप्त होतो असें लोक म्हणत आले आहेत; पण मी म्हणतों कीं, पुण्याईच्या जोरावरच मी स्वर्गाहून या मृत्युलोकीं आलों आहें. स्वर्गातल्या संकुचित स्थानीं माझ्याठायीं प्रकाश विकास पावला, तेव्हां माझ्याठायीं सर्वप्रकारें असंपूर्णता असतांहि मी या मृत्युलोकीं येऊन स्वर्गाला धन्य केलें. एक संन्यासी म्हणाला, 'जी भवबंधनाची शृंखला मला बद्ध करून ठेवीत आहे ती तोडून टाकून अनंत प्राणाच्या प्राप्तीसाठीं मी आतां तपश्चर्या करीन.' तो जगाला तुच्छ माया, अंधकाराची गुहा—म्हणून जगाचा त्याग करून दूर चालता झाला. आकाशांतली रस—गंध—वर्ण—छटा सर्व त्याच्या चेतनांतून पार घालविण्यांत आली, आणि तो आपल्या ठायींच सर्व चित्तवृत्तींचें आकर्षण करून अनंताची प्राप्ति करून घेण्याची प्रतिज्ञा करून बसला. इतक्यांत कोठूनशी एक मुलगी आली, ती त्याच्या दृष्टीस पडली. ती मुलगी अगदीं निराश्रित होती. संन्यासी तिला आपल्या गुहेंत घेऊन गेला. त्या मुलीनें हळू हळू त्याच्यावर स्नेहपाश टाकला. तेव्हां संन्याशी मनाचा धिक्कार करूं लागला. त्याला वाटूं लागलें कीं, ही मुलगी प्रकृतीची मायावी दूतिका आहे. प्रकृतीनें आपणास अनंतापासून दूर ठेवून मर्यादित क्षेत्रांत बद्ध करून ठेवण्यासाठींच तिला पाठविलें आहे. असें विचाराचें युद्ध त्याच्या डोक्यांत

चालले असतां एके दिवशीं क्रोधवश होऊन त्यानें त्या मुलीचा त्याग केला. मुलगी ज्याला आपलें आश्रयस्थान समजत होती तो तिचा आधार स्तंभ निघून आतांच ती तोडून टाकलेल्या वेलीप्रमाणें आक्रोश करीत मातींत लोळत पडली. इकडे तो संन्यासी जसजसा दूर जाऊं लागला तसतसा त्या मुलीचा आक्रोशध्वनि त्याच्या हृदयांत प्रतिध्वनि उत्पन्न करूं लागला. अखेर ही मुलगी मायावी नाहीं, खरी आहे, हें हृदयाच्या वेदनांनीं त्याला जाणविलें. मनाच्या अशा अवस्थेंत तो दूर उभा राहून जगाकडे पाहूं लागला, तेव्हां त्याचें माधुर्य आणि स्नेह, प्रीति इ. संबंधाची माणसाच्या ठायींची रसज्ञता त्याच्या मनांत जागृत झाली. तो म्हणाला, ' मी हातांतला दंडकमंडलू फेकून देतों. मला त्यांची जरूरी नाहीं. मर्यादेचा त्याग करून कोणतेंहि सत्य प्राप्त होणार नाहीं. या लहानशा मुलीवर प्रेम केल्यानेंच त्या स्नेहरसामध्यें अनंताची प्राप्ति मला होत आहे. बाहेर अनंताचा प्रकाश थोडाच आहे ? तो तर अंतर्यामींच आहे. '

मर्यादेच्या संगतींतच अनंताचें अनंतत्व आहे ही गोष्ट उपनिषदांतहि सांगितली आहे. अविद्या किंवा सीमेचें ज्ञान हेंच केवळ ज्ञान असें समजण्यांत अंधतामसिकता आहे. अनंताच्या ज्ञानालाच केवळ ज्ञान समजण्यांत तर याहूनहि अंधतामसिकता आहे. पण विद्या व अविद्या जेव्हां एकत्र होतात, तेव्हांच सत्याचें ज्ञान होतें.

मर्यादित जगाला अनंतापासून वेगळें काढून त्यांत बद्ध होऊन राहणें व्यर्थ आहे. काव्यांतून शब्दांना हाकलून लावून काव्यरस सेवूं पाहण्यासारखें तें आहे. अशा माणसाला काव्यरस कोठून प्राप्त होणार ? रस काढून टाकून नुसते शब्द ठेवणाऱ्या पंडिताच्या मूर्ख तेला तर सीमाच नाहीं असें म्हटलें पाहिजे.

---

## धर्मशिक्षण.

आपल्या देशांत आजकाल राष्ट्रीय विश्वविद्यालय स्थापण्याचा प्रयत्न ठिकठिकाणीं चालत असलेला दिसतो. लोकशिक्षणाची जबाब दारी लोकांवरच आहे, कारण समाजाची उन्नतिच नव्हे, तर त्याचें स्थैर्यहि शिक्षणावरच अवलंबून आहे. तेव्हां लोकांना शिक्षण देण्याचें काम लोक स्वतःच्या हातीं घेऊन तें स्वतंत्रपणानें जर पार पाडूं शकले नाहींत, तर अर्थात् तें काम तुमच्या समाजाविषयीं विशेषसें प्रेम नसलेल्या परकीय लोकांच्या हातीं पडणारच !

राष्ट्रीय विद्यालय म्हणजे काय ? याविषयींची स्पष्ट कल्पना आपण करून घेतली पाहिजे.

ही गोष्ट आज सर्वांला विदित आहेच कीं, ज्याला भारतीय राष्ट्र म्हणतात तें हिंदुस्थानांत राहणाऱ्या हिंदु, मुसलमान, खिस्ती इत्यादि भिन्न भिन्न धर्मसंप्रदायांतल्या निरनिराळ्या जाति एकवटून

झालेलें आहे. अर्थात्, या निरनिराळया जाति व संप्रदाय यांचें ज्या शिक्षणाच्या योगानें मानसिक ऐक्य साधतां येईल, असें शिक्षण देणारी संस्थाच राष्ट्रीय विद्यालय या संज्ञेस पात्र होईल.

एका सत्तेखालीं आल्यामुळे आमच्यांत जें ऐक्य झालें आहे, तें अगदीं वरवरचें ऐक्य आहे, त्या ऐक्याला दृढ करावयाचें असेल, तर स्वार्थाचा बळी दिला पाहिजे. स्वार्थाचें बंधन टिकणारें नसतें. कांहीं कांहीं प्रसंगीं, कांहीं विशेष अवस्थेंत ऐक्यापेक्षां विभक्तपणातच अधिक स्वार्थ साधण्यासारखा असतो. गेल्या महायुद्धाचे वेळीं फ्रान्स व इंग्लडची एकी होण्यांत फ्रान्स व इंग्लड या दोन्ही राष्ट्रांचा स्वार्थसंबंध होता. भविष्यकालीन युद्धांत जर त्यांच्यामध्यें तसा कांहीं संबंध राहिला नाहीं तर त्यांची ती एकी एका क्षणांत नाहींशी होईल.

आपल्या देशांतहि एका राजसत्तेखालीं असलेल्या लोकांचें स्वार्थसंबंध स्थायिक होऊन त्याचें राष्ट्रीय ऐक्य घडून येणें शक्य नाहीं. यासाठीं आमच्या ऐक्याचें क्षेत्र केवळ बाहेर असणें उपयोगाचें नाहीं, तें अंतर्यामींच असलें पाहिजे, म्हणून लोकांच्या मनांचें ऐक्य ज्ञानाच्या द्वारें घडवून आणणें हें राष्ट्रीय विद्यालयाचें उद्दिष्ट असलें पाहिजे.

अंधेरांत मनुष्य केवळ स्वतःला पाहतो. दुसरा कोणी येथें असेल ह्याचें ज्ञान त्याला नसतें. म्हणून, अंधेरांत माणसाला वाटतें

कीं, आपण एकटेच आहों. उजेडांत मनुष्यें परस्परांना पाहूं शकतात व त्यामुळें तीं अधिक निर्भय होतात.

ज्ञानाचा प्रकाश हा परस्परांच्या ओळखीचें व मनांच्या एकीकरणाचें एक मुख्य साधन आहे. परस्परांच्या ज्ञानाचें असें एकीकरण करणें हेंच राष्ट्रीय विद्यालयाचें काम आहे. हिंदुस्थानांतल्या सर्व जाति व संप्रदाय यांची परस्परांना चांगली ओळख व्हावी व त्यांच्या मनांचें एकीकरण व्हावें हें हवें असेल तर तें घडवून आणणारी विद्या राष्ट्रीय विद्यालयांतून दिली गेली पाहिजे.

पण धर्मासंबंधानें लोकांचें एकीकरण करणें जितकें कठीण आहे, तितकें विद्येपुरतें एकीकरण करणें कठीण नाहीं. आतांपर्यंत आपल्या देशांत जेवढीं राष्ट्रीय विद्यालयें स्थापन झालीं आहेत, तेवढी बहुतेक हिंदु विद्यालयें आहेत. यामुळें या संस्थांतून मुख्यत: हिंदूंचीं शास्त्रें व हिंदुधर्म शिकविण्याकडे शिक्षकांचा रोख असतो. याच्या योगानें परस्परांमधील भेद दूर होणें तर राहोच, पण उलट भेदबुद्धि मात्र दृढ होते.

ऐतिहासिक अवस्थाभेदामुळें मनुष्यामनुष्यांत स्वभावत:च धर्मभेदाला कारण उपस्थित होतें. त्याच्या बरोबरच आमच्या अंगीं जडलेल्या आरामाच्या संवयी व अहंकारभाव हीं प्रबल झाल्यामुळें निष्कारण दुसऱ्याशीं वितंडवाद घालण्याची इच्छा मनुष्याच्या मनांत उत्पन्न होते.

राष्ट्रीय विद्यालयांत सर्व धर्मांना जवळ जवळ स्थान दिल्यानें त्यांच्यांतला विरोध शांत न होतां उलट त्याची ज्वाला अधिकच भडकेल! कारण, भिन्नभिन्नधर्मी लोकांत सत्य कशास म्हणावें याच्याच विषयीं मुळीं वाद असतो. दोन धर्ममतांपैकीं एकाला सत्य म्हटलें म्हणजे दुसऱ्याला असत्य म्हणावेंच लागतें. इतकेंच नाहीं, तर धर्माचरणाच्या संबंधानेंहि असाच मुळापासून विरोध उत्पन्न होतो. एका पूजाविधीप्रमाणें जीवहत्या हें एक अवश्य कर्तव्य असतें, तर दुसऱ्या धर्माच्या तत्त्वाप्रमाणें हिंसा निषिद्ध असते. अशा दोन परस्पर विरोधी-धर्ममतांचें एकीकरण करूं पाहणें म्हणजे दोन विरुद्ध दिशांना जाणाऱ्या आगगाड्यांची भेट करूं पाहण्यासारखें आहे. अशी भेट करविण्यांत केव्हांना केव्हां तरी अपघात घडलाच पाहिजे.

म्हणून, निरनिराळ्या धर्म संप्रदायांना एकत्र आणूं पाहणें व्यर्थ आहे. आमच्या घरीं माझी निजण्याची स्वतंत्र खोली आहे, अथवा आमच्या घराच्या एका कोपऱ्यांत लिहिण्या वाचण्याची सगळी सामग्री ठेविलेली आहे. मला अशी संवय आहे कीं, त्याच ठिकाणीं आरामानें बसून काम करावें. त्या ठिकाणीं दुसऱ्या कोणी येतां उपयोगाचें नाहीं. आल्यास त्यांची अडचण व्हावयाची. त्यांनाहि अडचण आणि माझ्याहि कामाचा घोटाळा व्हावयाचा यासाठीं अभ्यासाची व काम करण्याची जागा निराळी आणि आल्यागेल्या माणसांना भेटण्याची जागा निराळी, अशी स्वतंत्र योजना करावी लागते.

पण माझ्या घरांत प्रत्येक जागा माझ्या स्वतःच्या व्यवहारासाठीं नेमून ठेविलेली असली व आल्यागेल्यासाठीं स्वतंत्र जागा नसली, तर इतर माणसांच्या गांठीं घेऊन त्यांचें आपल्या घरीं स्वागत करण्याचा विचार मला सोडून दिला पाहिजे, आणि सर्वांना स्पष्टपणें कळविलें पाहिजे कीं, मला दुसऱ्या कोणाशींहि संबंध ठेवावयाचा नाहीं.

पण घरांत अशी एखादी खोली अथवा माजघर असेल कीं, जेथें कोणाहि सभ्य माणसानें येऊन बसण्यास आणि बोलण्याचालण्यास हरकत नाहीं, तर त्या ठिकाणीं मी त्या घराचा मालक म्हणून न बसतां समाजांतलीं एक व्यक्ति अथवा गांवचा एक राहिवासी या नात्यानें मला तेथें बसतां येईल व मजकडे आलेल्या लोकांनाहीं कानकोंडें न वाटतां मोकळेपणानें माझ्याशीं बोलतां चालतां येईल.

जेथें देशांतल्या सगळ्या लोकांचें अथवा समाजाचें संमेलन होऊं शकतें, त्यालाच खरें राष्ट्रीयत्व म्हणावयाचे कांहीं ठराविक व्यक्तींचे संघ विशेष कार्यासाठीं स्वतंत्रस्थानीं खुशाल भरोत; पण राष्ट्रासंबंधीं जीं कार्यें करावयाचीं, त्यासाठीं सर्वसामान्य अशी एखादी बैठक असणें अवश्य आहे. त्याशिवाय कोणतेंहि राष्ट्रीयकार्य नीटपणें होत नाहीं.

त्याप्रमाणेंच धर्मसंबंधांतहि सर्वांना एके ठिकाणीं बसण्यासारखी अशी एखादी जागा नसली, आणि देशांतला प्रत्येक धर्म स्वतंत्र संप्रदाय होऊन बसला, आणि त्याचे आचार भिन्नभिन्न स्वरूपें धारण

करीत गेले म्हणजे त्यांची एकी कशी होणार ? विचारविनिमय तरी कसा होणार ? विचारविनिमयाला देखील जेथें जागा नाहीं, तेथें आचारांची एकी कशी व्हावयाची आणि जेथें विचार एक नाहींत, एकाचें तोंड पूर्वेस तर दुसऱ्याचें पश्चिमेस अशी जेथें स्थिति उत्पन्न होते तेथें राष्ट्रीयत्वाची भावना तरी कशी संभवनीय होणार ?

---

## मनोविकासाची प्रवृत्ति.

विश्वांतला कोणताहि व्यापार एकदेशीय नसतो. सर्वत्र संकोचन—संप्रसारण, उत्थान—पतन, ऱ्हास—वृद्धि, बहिर्गमन—अंतर्गमन, अर्जन—वर्जन, अंतर्भाव—तिरोभाव ( अंतर्धान किंवा अदर्शन ) इ. प्रवृत्ति बरोबर चाललेल्या असतात. या प्रवृत्ति एखाद्या वेळीं आपल्या डोळ्यांना दिसत नाहींत, आणि त्यांचे नियमहि आपणास कळत नाहींत. पण त्यांच्यांतहि छंद अथवा नियतकालिकत्व ( म्हणजे अमक्या कालांतरानें अमक्या गोष्टी घडावयाच्या असा कांहीं नियम ) आहे.

शाळेंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बुद्धींत व वृत्तींतहि अशा प्रकारची नियतकालिक भरती—ओहोटी—वृद्धि व ऱ्हास—असते. तिच्या बद्दलचे नियम समजून घेणें व तदनुसार विद्यार्थ्यांशीं वागणें हे शिक्षकांना अवश्य आहे. मुलगा पूर्वीं लक्ष लावून अभ्यास करीत असे, आणि तोच आतां तसें करीत नाहीं असें म्हणून शिक्षक पुष्कळ वेळां

त्याला रागें भरतात व शिक्षाहि करतात. पण सृष्टीच्या नियमांशीं झगडण्यापासून खात्रीनें नुकसानच होणार. त्यामुळें आपल्या बुद्धीचा ऱ्हास होत चालला आहे अशा प्रकारची निराशेची भावनाहि मुलांच्या ठायीं उत्पन्न होते. ती होऊं देणे अत्यंत अनिष्ट आहे.

ही जी मानसिक भरती–ओहोटी अथवा वृद्धिऱ्हास तिच्या संबंधानें थोड्याच शिक्षकांनीं विचार केलेला असतो. थोड्या दिवसांपूर्वींपासून युरोपांत ( Experimental Education ) म्हणजे प्रयोगमूलक शिक्षणपद्धति सुरू करण्याची खटपट चालली आहे. जुनी शिक्षणपद्धति सोडून शास्त्रीय प्रयोगांच्या पायावर नवी शिक्षणपद्धति रचण्याचा उद्योग चालला आहे. आतांपर्यंत ज्या कित्येक गोष्टी आपण स्वतःच्या अनुभवजन्य ज्ञानानें प्राप्त करून घेतल्या आहेत असें शिक्षक म्हणत असत, त्या कच्च्या आहेत–पायाशुद्ध नाहींत–शिक्षकांचा स्वतःचा स्वभाव, संस्कार, अभ्यास ( संवयी ), व मानसिक आलस्य यांच्यावर त्यांच्या ज्ञानाची मुख्य भर आहे. म्हणून शास्त्रीय पद्धतीनें शिक्षणतत्त्वांच्या नियमांचें ज्ञान करून घेण्याविषयीं विशेष उत्साह दृष्टीस पडत आहे.

मुलांच्या मानसिक शक्तीच्या ऱ्हासवृद्धीच्या छंदासंबंधानें शिक्षणशास्त्रज्ञांनीं अनेक प्रयोग करून पाहिले आहेत आणि त्यांवरून कांहीं नियम शोधून काढिले आहेत. रास्को साहेब लिहितात

कीं, मुलांच्या साधारण मनोविकासाप्रमाणें हाहि म्हणजे बुद्धीच्या ऱ्हासवृद्धीचा एक छंदच म्हटला पाहिजे ज्या मानानें त्यांच्या शरीराचा विकास होत जातो, त्याच प्रमाणांत हा मनोविकास होत असतो. दोघांचे पाऊल पुष्कळ अंशीं सारखें मागें किंवा पुढें पडतें. वयाच्या ज्या अवस्थेंत त्याचा शरीरविकास होण्याला स्वाभाविक विलंब लागतो, त्याच अवस्थेंत व त्याचप्रमाणें त्यांच्या मनोविकासाचीहि गति मंद होते.' या साहेबाच्या मतें मुलाच्या वयाच्या अकराव्या वर्षीचा काळ त्यांच्या बुद्धिविकासाला विशेष प्रतिकूळ असतो. मुलींच्या संबंधांत जात व देश यांच्या भेदाप्रमाणें हा काल म्हणजे बारावें, तेरावें, चौदावें वर्ष असतें. आपल्या देशांतहि मुलांच्या बुद्धिविकासाच्या मंदगतीचा काळ अकरावेंच वर्ष आहे कीं काय हे प्रयोगावांचून निश्चयानें सांगतां येत नाहीं.

सदर साहेब म्हणतात कीं, एकाच वर्षांतल्या भिन्न भिन्न काळीं मुलांच्या उंचींत व वजनांत फरक पडलेले दिसतात. फेब्रुवारीपासूच आगष्टपर्यंतचा काळ हा उंचीच्या वृद्धीला विशेष अनुकूल असतो, आणि सप्टेंबरपासून जानेवारीपर्यंतचा काळ विशेष प्रतिकूळ असलेला आढळतो. तोंच फेब्रुवारी ते जूनपर्यंतचा काळ मुलांच्या वजनांत वाढ होण्याला प्रतिकूळ असून जुलै ते जानेवारीपर्यंतचा काळ अनुकूळ असतो.'

विलायतेतल्या या ऋतूंशीं आपल्या देशांतल्या ऋतूंचा मेळ बसावयाचा नाहीं हें निश्चित आहे. पण शारीरिक वृद्धि—ऱ्हासाचा एक ऋतु असतो येवढी गोष्ट ध्यानांत ठेवणें जरूर आहे. कित्येक शाळांतून नियमित मुदतीनें मुलाचें वजन करून तें लिहून ठेवण्याचा प्रघात पडला आहे. सर्व मुलांचे वजन एकदम वाढलेलें किंवा कमी झालेलें दिसलें म्हणजे डाक्टरांना आश्चर्य वाटते. पण त्याला ऋतुभेद कारण असेल हें त्यांच्या डोक्यांत येत नाहीं.

एकाच दिवसाच्या विशेष भागांत मुलांच्या चित्तांत एकाग्रतेचें मान कमजास्त होते ही गोष्ट सामान्यत: सर्वांना ठाऊक आहे. पण त्याचें निश्चित प्रमाण मात्र प्रयोग करून कोणी काढलेलें नाहीं. सकाळच्या वेळीं चित्त लवकर एकाग्र होऊं शकते येवढी गोष्ट स्थूल मानानें आपणांस ठाऊक आहे.

ऋतुपरत्वें माणसाच्या उद्योगशीलतेंतहि फरक पडतात. माझा स्वत:चा अनुभव असा आहे कीं, काव्य किंवा गाणें यांच्या रचनेला वसंत, ग्रीष्म व वर्षा हे तीन ऋतु माझ्या स्वत:संबंधानें विशेष अनुकूळ दिसतात. थंडीच्या दिवसांत उत्साह वाटण्याला अन्य कारण असतें. त्या काळांत गद्य लिहिणें व भाषणें करणें या गोष्टी मला सोप्या वाटतात; पण रसयुक्त रचना करण्याला तो काल प्रतिकूळ असतो. मला असें वाटतें कीं, याच कारणामुळें इंग्लंड व

अमेरिका या देशांत असतांना अनेक भाषणें मला लिहितां आलीं, पण काव्य रचण्याचें काम माझ्या हातून झालें नाहीं; काव्यरचण्याचा विचारच माझ्या मनांत येईना.

सारांश, ऋतुपरत्वें माणसाच्या मानसिक शक्तींत फरक पडतो. पण याच वेळीं हीहि गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं, माणसाचें मन अतिशय जटिल असतें. त्याच्यावर निरनिराळ्या दिशांना प्रकाश पडत असतो. कांहीं विशेष काळीं माणसाच्या मनोवृत्ति कुंठित झालेल्या असतात, व त्याच वेळीं दुसऱ्या कित्येक वृत्ति वृद्धि पावतात कीं काय ते पाहणें अवश्य आहे. बाह्य दृष्टींत असें दिसतें कीं, वसंत ऋतूंत पुष्पांचा विकास विशेष जोराचा होतो, पण तोच शरद् ऋतूंत दुर्बळ आढळतो. कित्येक फुलें विशेष ऋतूंतच जोरानें उमलतात. त्याच-प्रमाणें मानसिक शक्तीच्या जोरदार किंवा दुर्बळ विकासाचेहि ठरा-विक ऋतु असावेत असें वाटतें. पण माणसाची उत्पादनशक्ति पूर्ण-निद्रिस्त अशी केव्हांहि नसतें हें प्रमाणावरून बहुतेक निश्चित झालें आहे. साहित्य, गणित, शास्त्र वगैरे निरनिराळ्या विषयाच्या शिक्ष-णाचेहि असेच कांहीं विशेष ऋतु नसतील कशावरून ? असण्याचा फार संभव आहे. एकाच काळीं भिन्न भिन्न विषयांची खिचडी मनाला चारली तर त्याला अजीर्ण होऊन ग्लानि येते कीं काय तें पाहणें अवश्यक आहे.

ऋतूंचा विचार बाजूला ठेविला तरी एकाच दिवशीं निर-निराळ्या तासांत निरनिराळ्या विषयांचें शिक्षण देणें अवश्य आहे कीं नाहीं याविषयीं शंका घेण्याला योग्य कारण आहे असें दिसतें. कोणी असेंहि म्हणतात कीं, विषयवैचित्र्य मनाला विश्रांतिप्रद होतें ही गोष्ट अंशतः सत्य आहे. पण तिच्या बरोबर दुसरी एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. ती ही कीं, एका विषयांतून मन काढून लागलींच तें अगदीं भिन्न स्वरूपाच्या विषयाला लावणें मनाला क्लेशदायक व ग्लानि आणणारें होतें. मन जसें ठराविक उत्तेजनानें तसें कांहीं विशिष्ट गती-नेंहि काम करीत असतें. त्याची एका दिशेची गति थांबवून निराळ्याच दिशेनें त्याला चालन दिल्यानें त्या मनाच्या शक्तीचा निष्कारण अपव्यय होतो.

तथापि वैचित्र्यामुळें मनाला उत्साह वाटतो व जोराच्या वेगानें मनाला चालन मिळतें या दोन्ही गोष्टींचा मेळ घालतां येतो. एकाच विषयाचीं निरनिराळीं अंगें असतात जसें—साहित्यांत गद्य, पद्य, निबंधलेखन तोंडपाठ करणें इ. गोष्टींचा अंतर्भाव होतो. साहित्यां-तच इतिहासाचाहि समावेश करतां येईल. अशा रीतीनेंच शिक्षणविष-यांत वैचित्र्य आणून मनाला पूर्णता आणतां येईल. गणितांतहि अंकगणित, बीजगणित, भूमिति इ. शाखा आहेत. गणित हें व्याव-हारिक शास्त्र आहे ही गोष्ट पाटीवर अंकांची घडामोड करतांना मुलें

विसरतात, आणि त्यामुळे आंकडे पाहिले की कित्येक मुलांचें डोकें उठतें. प्रत्यक्ष वस्तूंच्या द्वारें उदाहरणें सोडविण्याची संवय मुलांना लाविली, तर आंकड्यांसंबंधांचा त्यांचा कंटाळा घालवितां येईल, आणि आंकडे त्यांच्या पुढें मूर्त स्वरूपांत उभे राहतील. गणिताच्या नियमाप्रमाणें दुकान चालवून दाखविणें, पाहिजे त्या मापाच्या लाद्या घेऊन त्यांचें घर बांधणें, शाळेच्या इमारतीच्या खिडक्या दरवाज्यांचीं मापें घेणें, येवढेंच काय, पण वरणभात वगैरे अन्नांच्या प्रकाराला लागणारीं धान्यें योग्य प्रमाणांत मापून घेतां येणें, वगैरे हजारों प्रकारांनीं मनाच्या शिक्षणाचें रूपांतर प्रत्यक्ष हाताच्या कामांत करतां येईल.

---

शान्तिनिकेतन माला, भाग ४ था.



# भक्तवाणी.

अनुवादक,
वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.
संपादक, आनंद.

ईश्वर त्याच्याशीं ज्याच्या प्राणाचें असें संमेलन होत नाहीं, तो जगताला प्रेमदृष्टीनें पाहण्यास पूर्णपणें असमर्थ असतो. कोणी म्हणतात कीं, सर्व जगावर अगोदर प्रेम करावें म्हणजे मग ईश्वरासंनिध जातां येतें. ही गोष्ट केव्हांहि सत्य नाहीं; कारण, अगोदर ईश्वराच्या संनिध गेल्याशिवाय हृदय कोणत्याहि प्रकारें पवित्र भावना धारण करणारें व प्रेमळ होऊं शकत नाहीं. प्रेममय ईश्वराच्या जवळ जातांच हृदय प्रेमपूर्ण होतें; आणि त्याच्यावर प्रेम केल्यानें सारें जग मधुमय वाटूं लागतें. ज्यांना पूर्वी कधीं क्षमा करूं शकलों नव्हतों, त्यांच्याविषयींच्या सुद्धां क्षमेचे व प्रेमाचे तरंग यावेळीं हृदयांत उचंबळतात.

—ब्रह्मानंद केशवचंद्र.

## २१

परमेश्वर आपल्या हृदयांतली वांछनीय वस्तु आहे, तर मग तिला आपण कां पाहूं शकत नाहीं ? परमेश्वराचें दर्शन होण्यास कोणती अडचण आहे ? अडचण आहे ती आपली स्वतःचीच. आपल्या विषयकामना—विषयलालसा—याच मोठ्या अडचणी आहेत. आपली स्वार्थपरता व सर्व कुटिल भावना त्याच्यापासून आपणाला दूर लोटतात. आपण स्वतःजर अपवित्र आहों, तर त्या पवित्र पुरुषाजवळ जाण्याची इच्छा आपणांस कशी होते ? त्याची प्राप्ति व्हावी म्हणून आपला जीव व्याकुळ कां होतो ? आपण पापदोषांमुळें अतिशय दीन व निंदनीय होऊन मनानें म्हणतों कीं, ईश्वर आमच्याकडे पहात नाहीं असें दिसतें. तो प्रत्येकाच्या अंतःकरणात प्रवेश करण्यासाठीं किती प्रयत्न करीत असतो तें त्यावेळीं आपणांस कळत नाहीं.

ईश्वरासांनिध व जाऊन त्याचें दर्शन घेण्याची ईच्छा करीत असाल, तर अगोदर अंतःकरण पवित्र करा. अंतर्यामीं जर एखाद्या गूढ पापाचें पोषण करीत असाल, तर तें पाप मनांतून काढून टाका. तरच त्याचें प्रसन्न मुख तुम्ही पाहूं शकाल. ईश्वर आपल्यापैकीं कोणालाहि दूर ठेवूं इच्छित नाहीं, आपला स्वीकार करण्याच्या संधीची तो एकसारखी वाट पहात असतो. हाय ! तो परम पिता आपल्यासाठीं

किती झटतो तें आपण सदोदित मनांत वागवीत नाहीं. कोठें तो सगळ्या जगाचा राजा, अचिंत्य, अनंत पुरुष, आणि कोठें आम्ही हीन, मलिन, जीव ! पण आम्हालाहि तो विसरत नाहीं. आमच्या प्रेमाचा तो भुकेला आहे. या, आपण नम्र भावनें त्याच्याजवळ जाऊन त्याला म्हणूं कीं आम्ही आमच्या हृदयाचें सर्व प्रेम तुला अर्पण करीत आहों. तूं प्रसन्न चित्तानें त्याचा स्वीकार कर.

—महर्षि देवेन्द्रनाथ.

# मेस्मेरिझम इन्स्ट्रक्टर सचित्र

-अर्थात्-

## सचित्र मोहिनीविद्या शिक्षक.

ह्या अमूल्य विद्येचा पाश्चात्य शास्त्रज्ञकारांनीं सुलभ केलेल्या ग्रंथाधारानें सप्रमाण प्रयोग करून हें पुस्तक मराठीत कोणाचेंहि साहाय्य न घेतां घरबसल्या मेस्मेरिझमाचें, हिप्नाटिझमाचें, थॉटरीडिंग [illegible] योगाचा चमत्कार करता येतील अशीच अत्यंत सुलभ माहिती दिली आहे. ह्या प्रयोगानें दुसऱ्याला वश करतां येते औषधावांचून असाध्य रोग बरे करितां येऊन पैसा मिळवितां येतो. ( तिसरी अवृत्ति. ) किं. १६८. व्ही. पी. १८१४.



प्रो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें शहर.

जो आनंद देत असतो तो त्याच्या प्रत्येक शब्दांत आणि अक्षरांत पसरलेला असतो, तथापि संपूर्ण काव्य पाहिल्याखेरीज अर्थबोध होणार नाहीं. पूर्ण काव्यबोधाच्या योगानें माधुर्याची आणि सौंदर्याची आवड वाटूं लागतें; पण प्रत्येक शब्द वेगळा पाहूं लागलों तर निरर्थकत्व आणि विस्मय दिसूं लागतो. जर सगळ्या काव्याची सहाय्यता झाली नाहीं तर तें मौल्यवान वाटणार नाहीं.

जर वैराग्य स्वतंत्रपणाला विसरून अखंड सत्यामध्यें शिरूं लागेल तर मग त्याला एकटेपणाचा मोह पडणार नाहीं. मग पदोपदीं आम्हांला परमेश्वराचा बोध होईल. तोच आम्हांला हातीं धरून चालविल. आह्मांला कोठेंही अटकाव होणार नाहीं. मग प्रेमानें आपण बद्ध न होतां स्वतंत्र राहूं. त्या प्रेमाला आम्ही निर्मल प्रेम असें म्हणतों. तीच मुक्ति आणि तोच आसक्तीचा मृत्यु होय. मग वारा आल्हादजनक वाहूं लागेल. नद्या, अमृतरसानें खळखळतील. वनस्पती व औषधें मधुर होतील. रात्रीची भीति वाटणार नाहीं. आसक्ति ज्यावेळीं संपूर्णपणें नाहींशी होईल तेव्हां आकाश, वायु, प्रकाश, जल आणि पृथ्वी अमृतमय होईल. मग आनंदाला अवधि लागणार नाहीं. आसक्ति आमच्या चित्ताला बद्ध करिते. जेव्हां चित्त विषयातीत होऊन सत्याचा अनुभव घेऊं लागते तेव्हां वैराग्य आसक्तीचें बंधन तोडूं लागते. आसक्ति सुटल्यावर मग सर्वच सुंदर आणि आनंदरूप दिसूं लागतें.

# ६४ विश्वास.

आम्हांला एखादी गोष्ट साध्य झाली असें वाटूं लागणें ही एक प्रकारची बाधा होय. ही परिचयाची बाधा; परंतु कांहीं गोष्टींत आपल्याला विश्वासही ठेवावा लागतो. तेव्हांच आपण अज्ञानसमुद्र तरून जाऊं. ॲटल्यांटिक महासागर उतरून गेल्यावर अमेरिका लागते. जर

आपण या गोष्टीवर विश्वास ठेवला नाहीं तर आपण तेथें पोहोंचणार नाहीं. आम्ही भवसागर उतरून जाऊं या विश्वासानें शास्त्र आणि लोककथा ऐकल्या पाहिजेत; परंतु तसा परिचय जर न होऊं लागला तर मग धर्मसाधन बाह्य व्यापार होईल. नुसते लोकांचे अनुचर होऊं. आमचें अंतरीचें कर्म जागें होणार नाहीं. असली जडता उत्पन्न झाली म्हणजे इतर जन थट्टा करूं लागतात.

पुण्य हा जिन्नस काय आहे ? भगवंतानें आमच्या मागें कांहीं ऋण लाविलें कीं काय ? परंतु बाहेरच्या विषयाची तुलना करून पाहूं लागलें म्हणजे अंतरीचा मार्ग सांपडत नाहीं.

एकदां साधनां म्हटली म्हणजे मनुष्याचें परमलक्ष झालें पाहिजे. त्या मननाचें स्थान बाहेर नाहीं. जें अंतरामध्यें सांपडत नाहीं ते बाहेर कोठून सांपडणार ? आम्ही या विश्वब्रम्हांडाच्या विशाल गाभ्यामध्यें उभें राहणें हेंच महदाश्चर्य होय. केवळ खाणें, पिणें, फिरणें, झोंप घेणें, ही आश्चर्याची व्याख्या करितां उपयोगाची नाहीं. तो आपल्याला असा प्रश्न विचारीत आहे कीं तूं कोण आहेस ? हें सगळें कोणासाठीं आहे ? या प्रश्नाचें उत्तर पृथ्वीवर किंवा आकाशावर मिळणारें नाहीं. या प्रश्नाचें उत्तर आपल्या अंतरांत गुप्तरीतीनें वास करीत आहे. याचें एकच उत्तर आहे तें हें कीं, आत्म प्राप्ती कर. यापेक्षां दुसरी गोष्ट नाहीं. आत्म्याच्या पूर्णतेखेरीज कांहीं एक गोष्ट समजणार नाहीं. आत्मा जें कांहीं जाणतो

त्याकडे आमची दृष्टी जात नाहीं. तो आत्मा आम्ही फक्त आमच्या संसारांत पाहूं लागतों. त्याला केवळ घरांत पाहून भागणार नाहीं. चांगल्या तऱ्हेनें आणि पूर्णतेनें त्याला जाणणें होत नाहीं. यामुळें तो कांहीं वेळ सांपडला आणि कांहीं वेळ हरवला असें वाटतें. यामुळें आपण भय पावतो आणि रडूं लागतो.

आत्म्याला जाणल्यावर ऐश्वर्याचा लाभ होतों. त्याला जर आपण मृत्यूच्या सामग्रींत नेऊन घातलें तर आपण भयानें गांगरून जाऊं. परमात्म्यामध्यें त्याचें पूर्ण स्वरूप दृष्टीस पडेल. आत्म्याला सत्यतेनें जाणल्यावर आपण नाशाचा अतिक्रम करून जाऊं.

एकदां निरीक्षण करून पहा. सगळीं कर्में निर्मल करा. जरी चक्र फिरत असलें तरी बिंदु स्थीर आहे. आपण भ्रमणापेक्षां स्थीरते-कडे सर्व लक्ष दिलें पाहिजे. आपण ध्रुवाप्रमाणें आढळ राहिलें पाहिजे. आपला विश्वास मुळांत पाहिजे. बाह्यगतीकडे आपण दुर्लक्ष केलें पाहिजे. जें कांहीं फेरफार होत असतात. तें सर्व बाह्य स्वरूपांतच. तो फेरफार देखील मध्यवर्ती बिंदूभोंवतींच चालू असतो; पण स्थीरतेचा भाग लक्षांत न आल्यामुळें सारेच फिरत आहे असें वाटतें. एवढ्यासाठीं विश्वास कोठें असावा व कोठें नसावा हे कुशाग्र बुद्धिनें जो जाणील त्यालाच भवसागर तरून जाणें सोपें होईल.

## ६५ सिद्धि.

आम्हांला जें साधन करावयाचें त्यांत एक अडचण असते. ती अडचण म्हणजे आमच्या ठिकाणीं अभ्यास नाहीं. एका बाजूला साधन असतें; पण दुसऱ्या बाजूला अभ्यास नसल्यामुळें तें साधन आपल्याला साध्य होत नाहीं. तो अभ्यास नसल्यामुळें आम्हीं आंखडून गेल्याप्रमणें होतों. एखादा उद्देश मनांत धरून जर विचार करूं लागलों तर कार्याची चर्चा नीट होत नाहीं. हें सर्व साध्य

अभ्यासाचें आहे. तें पाहिजे असल्यास जडता उपयोगाची नाहीं. त्या उद्देशाचा भार सहन करण्याची आमच्या अंगीं शक्ती नसते. तो भार सहन करण्याला अभ्यास लागतो. साधन साधावयाचें असल्यामुळें आपली मोठी ओढताण चालते. एका बाजूला महत्वाचें परंतु अवजड साधन व दुसरें बाजूला जडता आणि अनाभ्यास ही गोष्ट घडवून आणण्याला उपाय न सांपडल्यामुळें आपण कृत्रिम उपायांची योजना करूं लागतो. ही गोष्ट करून आणखी असें होतें कीं, त्या कृत्रिम उपायांचा बोजा आपणावर पडतो. मग जीवनाचा बोजा सहन करण्याला कठीण जातें व आपली आपल्याला सुटका करून घेतां येत नाहीं. सिद्धि दूर आहे. साधनाचा आनंद वाटतो तथापि जीवाकडून गोष्ट घडण्याला यातायात पडते. जर आमची हालचाल झाली व थोडे फार कार्य आम्ही करूं लागलों तरच साधनाचा आनंद लाभतो पण सिद्धीच्या लाभासाठीं प्रवृत्त झाल्यावर आम्ही बांधले जातों. इच्छा हीच कष्टप्रद आहे; पण तिच्याखेरीज कार्यभागही होणार नाहीं. लहान मूल पडतां पडतां चालण्यास शिकतें. तें जर पडण्याची भिती बाळगूं लागलें. तर त्याला केव्हांच उभें ठाकतां येणार नाहीं. एवढ्याकरतांच सिद्धीच्या लाभासाठीं आपण साधनाकडे लक्ष दिलें पाहिजे. कोणत्याही कार्याला स्थैर्य आणि गति दोन्हीही अनुकुल लागतात. चित्तामध्यें विश्वास लागते तेव्हांच साधनांच्या कर्मांचा लाभ घडून येईल.

# ६६ निष्ठा.

जेव्हां सिद्धी अल्पांशानें दिसूं लागते तेव्हांच आनंद तिकडे धावूं लागतो. मग दुर्बलता थांबूं शकत नाहीं. खरें ह्मटलें असतां साधनेचा आरंभ हाच सिद्धीचा पाया होय. साधन दूर करून सिद्धीचा प्रकाश दिसणार नाहीं. एवढ्यासाठीं निष्ठा पाहिजे. जेव्हां भक्ति जागी होईल, भावनेनें हृदय पूर्ण भरून जाईल, तेव्हांच ज्ञानप्राप्ति व्हावयाची. भक्ति दूर केल्यावर आणि हृदय शून्य झाल्यावर त्या दुःख समयीं आम्हांला कोण सहाय्य करणार? त्यावेळीं निष्ठेचीच मदत. शुष्क चित्ताचा भार

सहन करणारी निष्ठाच होय. मरुभूमींतून प्रवास करावयाचा म्हणजे उंटच वहान पाहिजे. त्याठिकाणीं शक्तिमान तेंच. त्याला सुख न लागो, खावयास न मिळो, पाणी न भेटो, तापलेली वाळू असो, तो आपली पावलें टाकित असतो. त्याचें चालणें थांबत नाहीं. अशा बिकट स्थितींत मार्ग आक्रमण करणारा जीव उंटच होय. याप्रमाणें शुष्कतेमध्यें आणि रिक्ततेमध्यें या मृत्युलोकांत एखादे वेळीं खावयाला जरी न मिळालें तरी आम्हांला निष्ठा वाहून नेते. ज्याप्रमाणें उंट काटेरी झाडें खाऊन व पाण्याची पिशवी भरून घेऊन लांबचा पल्ला गांठतो. त्याप्रमाणें या मृत्यु लोकांतील आपत्तीची पर्वा न करतां आपण निष्ठेच्या बळावर त्याच्याकडे गेलें पाहिजे. आपण धीर सोडतां कामा नये. आपली उपासना व्यर्थ झाली असेंही समजूं नये. तें जे होणारें दुःख त्यालाही सहन करणारी निष्ठाच होय. अशा निष्ठेच्या मार्गानें चालूं लागल्यावर आपण एक दिवस त्याला जाऊन भेटूं. साल काढून टाकल्यावर फळाची गोडी जशी लागते त्याप्रमाणें कष्ट दूर झाल्यावर आपल्याला त्याचा आनंद मिळणार. निष्ठा हें प्राणाचें धन आहे. तिच्यामध्यें गंभीर असा आनंद आहे. तो उद्भवणारा आनंद पवित्र आणि अहेतुक असा आहे. तो निराशेला दूर करून टाकणारा आहे. तो मृत्यूचें भय बाळगणारा नाहीं. या मृत्युलोकांतील आमची सोबतीण म्हणजे निष्ठाच होय. सुख लागावयाचें म्हणजे ती आपण आपल्या अंतरांत ठेवली पाहिजे.

शान्तिनिकेतन माला भाग, २ रा.



# भक्तवाणी.

ॐ

संतवचनें साधे मुक्ति। संतवचनें ब्रम्हस्थिति ॥
कर्माकर्मांची शान्तिं। संतवचनें ॥ १ ॥
संतवचनें याग। संतवचनें सांग योग ॥
संतवचनें अनुराग। घडतां संग संतांचा ॥ २ ॥
संतवचनें ब्रम्ह–प्राप्ती। संतवचनें सायुज्यमुक्ति ॥
ब्रम्हादि पदें येतीं। संतवचनें समोर ॥ ३ ॥
संतवचनें सर्व सिद्धि। संतवचनें समाधी ॥
संतवचनें उपाधी। एकाजनार्दनी तुटतसे ॥ ४ ॥

—एकनाथ.

# भक्तवाणी.

१

कोणी म्हणतात परमेश्वराशी सहवास कोणत्याही रीतीनें होईल ? मनुष्याचा सहवास मनुष्याशीं होतो. तो ऐश्वर्यवान भगवान कोणीकडे ! व आम्ही क्षुद्र जीव कोणीकडे ? त्याच्यांत आणि आमच्यांत केवढी तफावत ! त्याची व आमची संगति जुळावी कशी ! त्याच्याजवळ सर्व तऱ्हेची पूर्णता व आमच्याजवळ अनेक गोष्टींचा अभाव. तो परमानंद. तर आम्ही नानादुर्गतीनीं भरलेलों. अशी स्थिति आहे. त्या महापुरुषाचें चरित्र ऐकून त्याच्याजवळ जाण्याला या क्षुद्र जीवाचें मन धजत नाहीं. त्याच्या निकट वस्ती करण्याला संकोच वाटतो.

ही गोष्ट आतां आपण येथेंच सोडून देऊं आणि सहवास कशाला म्हणतात तें पाहूं. सहवास म्हणजे एके ठिकाणींच असावयास पाहिजे असें नाहीं. दूरच्या वस्तुंशीं सहवास होत नाहीं काय ? बाह्य गोष्टी सोडून दिल्या तर अंतरमार्गानें आपला सहवास होऊं शकतो. श्रीमंती आणि अंतर सोडून दिलें तर जिव्हाळा आणि भक्ति या बाजूंनीं सहवास होऊं शकतो. आश्रयापासून आश्रित कसा बरें दूर

पाहूं शकेल ? आपल्या पूर्व कालीन् ऋषींनीं भगवान अनंताला आपल्या तळहातावर एखाद्या रत्नाप्रमाणें घेऊन त्याहाळून पाहिलें आहे. त्याप्रमाणें हाताचा स्पर्श त्या रत्नाला व्हावा त्याप्रमाणें आत्मद्वारें त्याच्याशीं त्यांचा स्पर्श झालेला आहे. तो आमच्या फार जवळ आहे. आत्मद्वारें आम्ही त्याला स्पर्श करतों. इतका निकट तो असल्यावर आमचा त्याच्याशीं सहवास होत नाहीं काय ? आम्ही जी प्रार्थना करतों ती तो ऐकतो आणि आम्हांला त्यानें जें ज्ञान दिलें आहे त्या मार्गानें आम्ही त्याचा उपदेश ऐकतों. इतकी गोष्ट झाल्यावर मग सहवासांत अंतर कोणतें उरलें ?

इतक्यावरही कोणी असें ह्मणत असेल कीं, त्याच्याशीं सहवासच होणार नाहीं तर मग आम्ही असें म्हणतों कीं, त्यांचें कोणाशीं जुळावयाचें नाहीं. आपलीं इंद्रियें स्थूल आहेत. त्यांना परमेश्वराचा उपदेश ग्रहण करतां येत नाहीं. कारण तो इंद्रियातित आहे. तो अचक्षु आणि अकर्ण आहे. तेव्हां आपलें चर्मचक्षु त्याला कसें पाहूं शकतील ? वस्तुस्थिति अशी जरी आहे तरी तो मात्र आपल्याला पाहूं शकतो व जाणूं शकतो. त्याला अशक्य कांहीं नाहीं. सारख्याला सारखें झालें पाहिजे—म्हणजे संगत जुळतें. तो जर अचक्षु आहे तर आपणही आपले डोळे मिटून त्याचें ध्यान केलें पाहिजे म्हणजे मग त्याला आपण बघूं. जीवात्मा व परमात्मा यांच्यामध्यें येवढें मोठें

आकाश असून तें देखील आड येत नाहीं. यांतील हेतु एवढाच कीं, पंचमहाभूतें बाजूला सारलीं म्हणजे जीवात्मा व परमात्मा यांच्यामध्यें अंतर रहात नाहीं. तेव्हां सहवास करावयाचा म्हणजे आपण स्थूल गोष्टी बाजूला ठेविल्या पाहिजेत आणि त्या बाजूला ठेवावयाच्या म्हणजे त्यांच्या वरील लोभ आपण कमी केला पाहिजे. जडाची व चैतन्याची संगत जुळावी कशी ? जर ती संगत जुळत नाहीं तर मग आपणही आपल्यांतील जड अंशाकडे कानाडोळा करून चैतन्यस्वरूप होऊन राहिलें पाहिजे.

—महर्षि देवेन्द्रनाथ.

२

जर आपल्यामध्यें सहृदयता असेल तरच त्याची व आपली भेट होईल. शुष्क मरुभूमि ही देखील फलपुष्पांनीं सज्जित होईल. कर्मक्षेत्रांत जाऊन जर आपण कर्माचेंच अवडंबर माजवूं लागलों तर त्यांत आपला मोठा तोटा आहे. हृदयशून्य असल्यावर आपली प्रातः-काळची, माध्यान्ह काळची व सायंकाळची उपासना निष्फळ होईल. आपल्यामध्यें चांचल्य आहे. तो स्थिर व शांत आहे. आम्ही जर स्वस्थ चित्तानें अल्पकाळच उपासना केली तर ती फलद्रूप होईल. दिवसभर चालणारे उद्योग डोक्यांत घेऊन जर आम्ही नानाकल्पना तरंगांत तरंगूं लागलों आणि अशा प्रकारची उपासना कितीही दिर्घकालपर्यंत केली तरी तिचा काय उपयोग! ईश्वर एकेठिकाणीं व आम्ही नाना-ठिकाणीं. एवढ्यासाटीं एकाग्रता पाहिजे. ईश्वर आपल्या नेहमींच्याच स्वरूपांत आहे. आम्ही मात्र बहुविध बनलों आहोंत.

—ब्रम्हानन्द केशवचन्द्र.

३

आपलें मन फार खराब झालेलें आहे. सुई जर चिखलांत पडली असली तर तिला लोहचुंबक ओढूं शकत नाहीं. ज्यावेळीं आपण सुईला धुवून काढूं त्यावेळीं लोहचुंबक तिला ओढूं शकतो. याचप्रमाणें आपण आपल्या पापी मनाला प्रथम शुद्ध केलें पाहिजे; नंतर ईश्वर आपल्याला जवळ करील. मन शुद्ध करावयाचें म्हणजे आपल्याला अनुताप झाला पाहिजे. तेव्हां ईश्वररूप चुंबक आपल्या मनोरूपी सुईला ओढून जवळ घेईल.

—रामकृष्ण परमहंस.

## ४

परमेश्वराची उपासना करणें, त्याची पूजाअर्चा करणें, हा आमचा स्वभाव आहे; पण उपदेशानें, शास्त्रानें आणि लोकांच्या सांगण्यानें, आपली ईश्वराकडे प्रवृत्ति होते. ज्याप्रमाणें आपल्या ठिकाणीं आहार, निद्रा स्वाभाविक आहेत त्याप्रमाणें उपासनाही स्वाभाविक व्हावी. मला भूक लागावी, तहान लागावी अशी आपली धडपड नसते; पण भूक लागल्यावर आपण अन्न खातो व तहान लागल्यावर पाणी पितों. आपण क्षुधेसाठीं खटपट करित नाहीं तरी स्वाभाविक रीतीनें भूक लागते. त्याप्रमाणें स्वाभाविक रीतीनें आपली उपासना झाली पाहिजे. जें आपल्याला अन्न खावेसें वाटतें तें क्षुधेमुळें होय. लोकांच्या सांगण्या सवरण्यानें आपण अन्न खात नाहींत त्याप्रमाणें शास्त्रें पढून किंवा लोकांचा उपदेश ऐकून जी आपण उपासना करतो ती बरोबर होत नाहीं. क्षुधा लागल्यावर अन्नासाठीं जसा प्राण व्याकूळ होतो त्याप्रमाणें परमेश्वर दर्शनाची इच्छा झाल्यावर उपासनेसाठीं आपला जीव वेडा झाला पाहिजे. जर क्षुधा लागली नाहीं तर अन्न ग्रहण होत नाहीं. याप्रमाणें ईश्वराला बघण्याची उत्कंठा झाल्याखेरीज आपल्याला उपासनेचाही बोध होत नाहीं. नुसता मंत्रोच्चार होतो स्वभाव म्हटला म्हणजे रात्रंदिवस उपासना झाली पाहिजे. ज्यावेळीं आपण उपासना करतों त्यावेळींच ईश्वर असतों असें मात्र नाहीं तो नेहमींच आहे.

आपली उपासना मात्र कांहीं काळ होते. आपला श्वासोच्छ्वास ज्याप्रमाणें सतत चालू आहे त्याप्रमाणें आपली उपासना झाली पाहिजे. तो बंद पडावा असें आपण केव्हांही इच्छित नाहीं. तो मात्र आपण आपला स्वभाव समजतो. दुसरी गोष्ट अशी जर ईश्वर नित्य आहे तर आपली उपासनाही नित्य झाली पाहिजे. तसेंच तो जर अनंत आहे तर आपल्या उपासनेला मर्यादा का असावी? ईश्वर विश्वाची जननी आहे. तिला उपासनेच्याद्वारें मुलांनीं नित्य हाक मारली पाहिजे.

—विजय–कृष्ण गोस्वामी.

५

उपासना फलद्रूप होण्यासाठीं काय केलें पाहिजे असें जर आम्हांला कोणी विचारलें तर आम्ही त्याला सांगतों कीं, आपण आपल्या आकांक्षा उच्च राखा. आपण आपल्या मनाला शुद्ध ठेवा. द्वेष बाजूला करा. विनय धारण करा. क्षुद्र आसक्ति झुगारून द्या. उपासनेचें सार्थक तेव्हांच होईल. नाहीं तर नुसती शब्दांची बडबड काय कार्य करणार? याचा परिचय आम्हांला दररोज येतच आहे. आपण किती तरी उपासना केल्या पण आपल्या वांट्यास काय आलें आहे? याचें कारण गुप्त नाहीं. तें उघड आहे. उपासनेचे मंत्र कायम आहेत; पण आपलें अंतःकरण निर्मल नाहीं.

—शिवनाथशास्त्री.

६

आम्ही आमच्या सुखदुःखांचा मार्ग आक्रमण करीत असतां आम्हांला असें दिसून येतें कीं, आम्ही मुक्तीकडे हळूं हळूं धांव घेत आहोंत. अशी आमची मुक्तीबद्दल कल्पना होते. वास्तविक आम्ही मुक्तच; परंतु खरा भाव ध्यानीं न येतां आम्ही मुक्तिपथाला चाललों आहोंत असें वाटत असतें. वास्तविक, पोकळ कल्पना सुटल्याविना आपलें कार्य होणार नाहीं. तोंपर्यंत आपलें जीवन वृथा आहे. प्रकृति ही प्रत्येक क्षणाला आपल्याला खालीं ओढीत आहे. तिनें आपल्याला दास बनविलें आहे. अशा प्रकृतीच्या पोटांत प्रथम शिरून नंतर जी सुटका होते तीच आपल्याला मुक्ति वाटते. पूर्वींपासून मुक्त असून प्रकृतीचा वेढा अंगावर घेतल्यानें मुक्ति दिसत नाहीं. आपण मायेनें बद्ध झालों आहोंत. ती माया दूर करीत असतांना क्षणाक्षणाला आपल्याला मुक्तीचा भास होतो. जणूं काय मायाच आम्हांला मुक्ति दाखवित आहे. मुक्तस्वभावाला मुक्तीचा प्रकाश दिसावा हें आश्चर्य आहे; परंतु मायेच्या मधुर व्यापारांत संचार करित असतानां तिला सोडून जाणें कष्टप्रद वाटतें. वास्तविक प्रकार जरी असा आहे; तरी आमचें अंतर आम्ही मुक्त आहोंत असेंच बजावित असतें. जगांतील कोणत्याही गोष्टीकडे बघितलें असतां एकच रीत दिसून येते. स्पष्ट धर्म आपल्याला समजत नाहीं. तथापि एवढ्यासाठीं धर्म शद्वाचा संकीर्ण अर्थ घेणें

योग्य नाहीं. सर्व समाजाचा जीव एकाच बाजूला आहे. कोणी ओळखो वा ना ओळखो; पण परिश्रांत आणि भाराक्रांत या दोघानांही देवाजवळ बसावयाचें आहे आणि हाच भाव आमच्याजवळ कोणत्या तरी रूपानें नेहमीं असतो. आमचा जन्म झाल्यापासून आमची हरएक गति परमेश्वरासाठीं आहे.

—विवेकानंद.

७

कळशीभर पाण्याच्या डबक्यांत मासा खेळत राहतो. त्याप्रमाणें क्षुद्र विषय, चिंता आणि लहान ध्येय यामध्यें आपला आत्मा वस्ती करून सुखी होतो. एखाद्या माशानें समुद्र न पाहतां एखाद्या डबक्यालाच मोठें म्हणावें त्याप्रमाणें क्षुद्र आकांक्षा आणि अल्प समुदाय घेऊन आपण आपल्याला मोठे समजत आहोंत. या अमर्याद विश्वाची आपल्याला कल्पना होत नाहीं. आपला दररोजचा कारभार हा आयुष्याचा आधार नाहीं. ज्यावेळीं आपण अनासक्त भावानें व्यापार करूं त्यावेळीं समर्थ होऊं. महताचें ज्ञान झाल्याविना आणि महताचें ध्यान हृदयांत भरल्याशिवाय आपली क्षुद्रता दूर होणार नाहीं. एकदां आपल्याला महताची गोडी लागली म्हणजे मग आपण क्षुद्रविषयांत आसक्त होणार नाहींत. अनासक्त भावानें वागण्याचा उद्देश केवळ मोठें होण्यासाठींच आहे. मनापुढें उच्च आदर्श आणि पवित्र कल्पना सदोदित ठेविल्याशिवाय सर्व श्रेष्ठ लाभ होणार नाहीं. हाच मोठें होण्याचा उपाय आहे.

—शिवनाथशास्त्री.

८८

आपल्या प्रत्येक लक्षणांत, प्रत्येक कर्मांत, प्रत्येक निग्रहांत, प्रत्येक भोगांत, जर ईश्वराचा लाभ झाला तरच आपण जीवन धारण केल्याचें सार्थक आहे. नुसता स्वर्गाचा आनंद वर्णन करून भागत नाहीं. सद्गुणाला जवळ करण्यासाठीं काय केलें पाहिजे याचा विचार झाला पाहिजे. गंभीर भाव धारण केला पाहिजे. आपल्याला उत्कृष्ट अवस्था असावी असें वाटलें पाहिजे. इतकें झाल्यानंतर परमेश्वराशीं मीलन झाल्याचा लाभ दिसून येईल. ब्रह्ममननानें भावना ब्रम्हमय होते. एवढ्यासाठीं नीति आणि चसरित्र यांची गरज आहे. नाना देशाच्या ज्ञानवान आणि ब्रम्हवान लोकांशीं सहवास करून ही बंधुता प्राप्त करून घ्यावी. सत्यस्वरूपाशीं समरस होण्यांत महाभाग्य आहे; परंतु गुणाला जवळ करण्यांत आपण अवगुणी होतों. याचें कारण गुणच कळला नाहीं किंवा त्याचा लाभ करून घेता आला नाहीं असें पाहिजे तर ह्मणावें आपण प्रेमिक होऊन विषयी बनतो. ज्ञानी बनून अभिमानी होतो. नैतिक होऊन निष्ठुर होतो आणि साधक होऊन असामाजिक बनतो. एवढ्यासाठीं धर्म समजण्याला सामंज्यस्य पाहिजे. आपल्याला मनुष्याची ओळख झाली पाहिजे. त्याचा आपला पवित्र संबंध घडला पाहिजे. जेथपर्यंत मानवसमाज पसरला आहे तेथपर्यंत ब्रह्म साधनाचा मार्ग आहे. पशु, पक्षी, वृक्ष, पाषाण आपल्याला काय

बोध देणार ? ज्यावेळीं आपल्याला समानता कळून येईल त्यावेळीं आपल्याला आपला अधिकार समजून येईल. या गोष्टीला निश्चय लागतो. उच्च कर्तव्य समजलें नाहीं, तर धर्माचा प्रकाश दिसलाच नाहीं असें समजावें. एवढ्यासाठीं शरीर हृदय, आत्मा, संसार हीं परमेश्वरासाठीं तन्मय झाली पाहिजे. निरंतर जीवन असावें असें जर कोणाला वाटत असेल तर त्यांनीं आम्हीं सांगितलेला स्वर्गीय समंजसपणा धारण करावा.

—प्रतापचन्द्र मुजुमदार.

१

धर्माला जवळ करून जेव्हां आपण कार्य करूं लागतों तेव्हां तें लौकिक कार्य न होतां पारमार्थिक कार्य होतें. आपल्या हरएक कर्माला धर्माची जोड पाहिजे. आपला भाव नेहमीं पारमार्थिक असावा. साधुसंताच्या ठिकाणीं आपलें प्रेम असावें. ज्ञानवानाची आपण भक्ति करावी. नुसता तत्वज्ञानाचा अभ्यास करून धर्माचा लाभ होत नाहीं. तत्वज्ञानानें आपण आपल्या प्रेमाला जागें करावें एवढेंच त्याचें महत्व. तसेंच चित्राप्रमाणें साधुचरित्र पाहून काम भागत नाहीं. तर त्यांच्या वागणुकीला अनुसरून आपण आपलीं पावलें टाकण्यांत सार्थक आहे. जिवंतशक्तीप्रमाणें आपल्या अंतःकरणांत या गोष्टींचा प्रवेश झाला पाहिजे. तेव्हांच धर्माचें आपल्याला साह्य झालें असें समजावें. धर्माचा आपल्याला भार न वाटला पाहिजे. त्याच्यापासून आपल्याला आनंद झाला पाहिजे. मनुष्याच्या कायद्यांत जरी नीतीचे नियम लिहीलेले नाहींत तरी अंतःकरणांत बोध होऊन आत्म ज्ञानानें व बलानें वृद्धींगत होतो.

—शिवनाथ शास्त्री.

१०

आमची प्रार्थना अशी आहे कीं, आम्हांला जिकडे तिकडे त्याचा प्रकाश दिसावा. आपल्याला दुर्बळपणा वाटूं लागला कीं, आपण त्याची पूजा करावी. त्याचा महिमा गाण्याचा आपण अभिलाष धरावा. ज्यावेळीं तो आपल्याला दिसणार नाहीं त्यावेळीं तो कां दिसत नाहीं याचा विचार करावा.

जर त्यानें आपल्याकडे बघितलें नाहीं तर मग आपली प्रेमदृष्टि कोणाकडेही जाणार नाहीं. एवढ्यासाठीं त्याचा प्रकाश आपण पाहिला पाहिजे. तो प्राणस्वरूप आहे. तो सर्व व्यापी आहे. तो अमृत पुरुष आहे. तो आत्म्यामध्यें ओतोप्रोत भरलेला आहे. त्याला प्रीतिपुष्प वाहण्यांत कल्याण आहे. हा शुभ उद्देश आहे आणि हा अवश्य सिद्धीस गेला पाहिजे. ज्या ज्या बाजूंनीं आम्हाला लाभ वाटतो त्या त्या बाजूंनीं तो आम्हांला भेट देत आहे. आपल्या अंतरांत तो सुंदर पुरुष बसून राहिला आहे. तो आमचें उपास्यदैवत आहे. आमची जागृत व जिवंत देवता तीच आहे. आमचें शरीर हें त्याचें मंदीर आहे. आमचा आत्मा हें त्याचें आसन आहे आणि त्याठिकाणीं तो विराजमान झालेला आहे. एवढ्यासाठीं आपली उपासना बाह्यस्वरूपाची न होतां ती अंतर मार्गानें झाली पाहिजे.

—महर्षि देवेन्द्रनाथ.

॥ ११ ॥

परमेश्वराचा लाभ होण्यासाठीं नानाप्रकारचे लोक किती तरी कष्ट, कितीक साधनें व किती शारिरीक तपें करित आहेत त्याला सुमार नाहीं. आत्म्याच्या बाजूनें आपण त्याला जर न जाणलें तर बाह्य क्रिया करून आपल्याला केव्हांही तो लाभ होणार नाहीं. तो सत्यस्वरूप, ज्ञानस्वरूप, आणि अनंतस्वरूप असा आहे. तो आमचा पिता आहे व आम्ही त्याचे पुत्र आहोंत. तो आमचा गुरु आहे व आम्ही त्याचे शिष्य आहोंत. तो आमची माता व आम्ही त्याचें स्नेहधन आहों. ज्या अर्थीं तो आमचा पिता आहे त्या अर्थीं तो आम्हांला या संसारांधकारांतून बाहेर काढून प्रकाशांत आणून ठेवील. त्याला आपण अशी प्रार्थना करावी कीं, " हे देवा तूं आमचे आईप्रमाणें रक्षण कर. तूं आमचा अभयदाता पिता आहेस. ज्ञानदाता गुरु आहेस. " त्याची प्रीति संपादन झाल्यावर मग आपले प्रेमाश्रु विसर्जन होतील. तो आम्हांला पहात आहे. तो आह्मांला जाणित आहे व तो आमच्यावर प्रीति करीत आहे. हा भाव आमच्यांत उत्पन्न झाल्यावर मग आम्हांला नूतन जीवन येईल. सकलार्थांचें साधन प्राप्त होईल व मग आम्ही संसारांत अडकून बसणार नाहीं; नंतर स्वदेश असो कीं विदेश असो सर्व ठिकाणीं व सर्वावस्थेंत आपल्याला त्याचाच महिमा दिसून येईल.

—महर्षि देवेन्द्रनाथ.

## १२

बाहेरच्या बाजूनें पाहिलें असतांना असें दिसून येतें कीं, सर्वांवर मृत्यूचें अधिपत्य आहे. कोणी सुस्थ असो, कोणी म्हातारा असो, कोणी धनिक असो, अथवा कोणी दरिद्री असो, कोणी मुर्ख असो वा पंडित असो, कोणी धार्मिक असो, अथवा असाधु असो, कोणालाही मृत्यूला चुकवून जातां येत नाहीं. पक्षपात करावा हा मृत्यूचा स्वभाव नाहीं. मृत्यु हा सर्वांना गिळून टाकित आहे. जगाचा इतिहास पाहिला तर आपल्याला मृत्यूचाच अधिकार दिसून येत आहे; परंतु प्रत्येक जणाच्या हृदयांत असें एक ठिकाण आहे कीं, त्या ठिकाणीं मृत्यूचा ताबा चालत नाहीं आणि तें स्थान अमर आहे. मृत्यूच त्या ठिकाणीं मरून पडला आहे !

आमचा जो कारभार चाललेला असतो तो कांहीं वेगळाच आहे. कोणाची प्रेमळ होण्यासाठीं खटपट असते. कोणी पवित्र होण्यासाठीं व्याकूळ होतो; परंतु या दोन्ही गोष्टी अस्वाभाविक आहेत. जोपर्यंत या गोष्टी निष्फल होत आहेत तोपर्यंत साधकाला अमर होतां येणार नाहीं. जो कोणी आत्मप्राप्तिसाठीं झटत असेल त्यालाच अमर होतां येईल. त्याचीच यथार्थ उन्नति होईल. स्वर्गीय जोत्स्ना त्यालाच शान्ति देईल आणि त्यालाच अति सुंदर कांतीचा लाभ होईल. अशा अमरस्थानाजवळ जाण्यासाठीं मनुष्याचा जन्म झालेला आहे आणि असें

जें अमर ठिकाण अशाच ठिकाणीं ईश्वराचा साक्षात् योग आहे. धर्म जर कशासाठीं असेल तर तो एवढ्याचसाठीं कीं, त्यानें आपल्याला अमर ठिकाणाकडे नेऊन पोंचतें करावें. ही गोष्ट जोंपर्यंत झाली नाहीं तोपर्यंत आम्हाला दुःखांतच मरावें लागणार. आमच्या आशा परिपूर्ण होणार नाहींत व आम्हांला आनंदाची प्राप्ति होणार नाहीं.

—ब्रम्हानन्द केशवचन्द्र.

## १३

त्याची प्राप्ति कोणत्या रीतीनें करून घेतां येईल ? तो आहे कोठें ? एवढें खास कीं तो बाहेर नाहीं. ही गोष्ट आम्हीच सांगतों असें नाहीं. ती सर्व ठिकाणीं सांगितली जाते आणि धर्माचा उपदेशही असाच आहे. आपण मुखानें बोलतों एक व करित असतों दुसरेंच. हा मिथ्याभाव आपल्यांतून निघून गेला पाहिजे. जें अंतरांत आहे तें अद्याप बाहेर आलें नाहीं. ज्याप्रमाणें बीजामध्यें वृक्ष लपलेला असतो त्याप्रमाणें आत्म्यामध्यें सर्व कांहीं दडून बसलेलें आहे. सुसमय प्राप्त झाल्यावर ब्रह्मकृपेनें त्याला अंकूर फुटून तो बाहेर येईल. मग त्या प्रेम-वृक्षाचें दर्शन घेतलें तर असें दिसेल कीं, त्या ठिकाणाहून हजारों ग्रंथ आणि हजारों उपदेश निघालेले आहेत. आतां त्या बीजाला अंकूर केव्हां फुटतो ? तर बीजाला प्रथम मरावें लागतें तेव्हां वृक्ष बाहेर दिसूं लागतो. मग एका बीजापासून हजारों फळें उत्पन्न होतात. इतकी गोष्ट समजल्यावर हें ध्यानांत ठेवावें कीं, आपण त्याचे प्राण आहोंत. आपण म्हणजे विश्वाचा प्राण आणि बाकी सारा मृतदेह आहे. छाया आहे. त्याची शक्ति बीजांत कार्य करीत आहे म्हणून बीजाला अंकूर फुटत आहे व वृक्ष फलपुष्पांनीं सज्जित होत आहे. खरें पाहिलें असतां तो बाहेरही आहे व आंतही आहे. प्रश्न एवढाच आहे कीं, त्याला बाहेर कसें ओळखावें व आंत कसें जाणावें ? इहलोक आणि परलोक

एकच आहेत. ते एकमेकांपासून दूर नाहींत. जोंपर्यंत अज्ञान असतें तोंपर्यंत परलोक प्राप्तीची चिंता असते. जोपर्यंत आपला अहंकार नष्ट झाला नाहीं तोपर्यंत आपल्याला कशाचीही प्राप्ति होणार नाहीं. जों-पर्यंत आपल्याला सत्य गोष्ट कळली नाहीं तोपर्यंत आपली स्थिति कस्तुरीमृगाप्रमाणें असते. कस्तुरीमृगाला सुगन्ध कोठें शोधावा असें होऊन जातें. सुगन्ध त्याच्याजवळच असतो; परंतु तो त्याला न समज-ल्यामुळें तो त्याचा शोध करीत इकडे तिकडे भटकत असतो. ही आश्चर्याची अवस्था आहे. विशेष गोष्ट ही कीं, "माझें माझें" ही भावना गेल्याखेरीज आपल्याला जें पाहिजे त्याची प्राप्ती होणार नाहीं. जर आपला मूर्खपणा आपल्याला कळला नाहीं तर मग आपण शहाणें कोठें झालों ? आमच्या अहंकाराला धिःकार असो. प्रत्येक मुहूर्ताला त्याच्या प्राप्तीसाठीं आपला प्राण व्याकूळ झाला पाहिजे. सकल चरचरांमध्यें एकच प्रभु आहे आणि तो सकल नरनारीमध्यें वास करीत आहे. त्याच्यामध्येंच आपल्याला हें विश्व बघतां आलें पाहिजे. ईहलोक आणि परलोक हीं त्याच्यांतच वास करित आहेत.

—विजयकृष्ण गोस्वामी.

## १४

पूर्ण आत्मत्याग कशाला म्हणतात ? जर आपण संपूर्ण आत्मत्याग केला तर मग शिल्लक काय राहिलें ? आत्मत्याग करावयाचा म्हणजे अहंकार टाकून देणें होय. आत्मत्याग याचा अर्थ स्वार्थाचा त्याग करणें असा आहे. पूर्वीं अहंकार आणि माया कुसंस्काराच्या योगानें आपल्याला फलदायक होत नसत; परंतु तो अहंकार टाकून दिल्यावर आपला आत्मा नित्यस्वरूपांत राहतो. तो आपल्या निजस्वरूपानें प्रकाशत असतो. ज्या ठिकाणीं आत्मत्याग होतो त्या ठिकाणीं नीतिशिक्षणाचें केंद्र असतें. मनुष्य ही गोष्ट जाणो किंवा न जाणो तो त्या गोष्टीकडे आपला मार्ग आक्रमण करित आहे. अल्पाधिक प्रमाणानें प्रत्येकजण या गोष्टीचा अभ्यास करित आहे. मात्र पुष्कळ लोक अज्ञान भावानें नीतीचें वळण गिरवीत आहेत. तथापि त्यांच्याकडून नकळत ज्ञानयज्ञाचें आचरण घडत आहे. व्यावहारिक जीवाचे हें प्रकृतिस्वरूप आहे; परंतु जाणीव होऊन वागणारा पारमार्थिक जीव लवकर मुक्त होतो.

—विवेकानन्द.

## १५

त्यानें आमच्या अंतरांमध्यें जसा प्रवेश केला आहे तसा प्रवेश आमच्या जीवलग बंधूला किंचितसुद्धां करतां येत नाहीं. आमचे बंधू आम्हांला बाहेरून गोष्टी सांगतात व तो आंत बोलत आहे. कोणत्याही गोष्टीशीं आम्हांला संबंध ठेवावयाचा असला तर आकाशाची आड-काठी असते. अगदीं निकट असें आह्मांला कोणाजवळही राहतां येत नाहीं. मात्र ईश्वराचा व आमचा एकजीव झालेला आहे. तो जरी निराकार आहे तरी आम्हांला चोहोंकडे शून्य दिसत नाहीं. आम्ही तो कोणी तरी एक असल्याचे जाणित असतो. जर आह्मांला आत्म्याची उपलब्धी करतां आली नाहीं तर मग आम्हांला कोणाचेंही मन जाणतां यावयाचें नाहीं. एकदां त्याला पारावार नाहीं असें ह्मटलें म्हणजे आमची पूजा व्यर्थ जाणार कीं काय ? आम्ही आमचें प्रेम शून्याला अर्पण करतों काय ? त्याच्या व आमच्यामध्यें जर आकाश आड येत नसेल तर मग आम्हांला हरएक वस्तु जवळच आहे. तो आपला पिता आहे व तो आपला मित्र आहे. तेव्हां आपण त्याला नेहमीं आश्रयरूपानें पाहिलें पाहिजे.

—महर्षि देवेन्द्रनाथ.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क. ........ —१६०—

REFBK-0002367
REFBK-0002367